मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

श्री. ना. बनहट्टी
विश्वास कानडे
उ. रा. गिरी
बाबा मोहोड
रमेश वाबगावकर
विश्वास
वसन्त निनावे
राजा मंगळवेढेकर
वामन इंगळे
श्री
सुरेश डोळके
इंदुमती शेवडे
वसन्त वऱ्हाडपांडे
केशव केळकर
याशिवाय
संघवार्ता

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

फेब्रुवारी १९५४ किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक–पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वर्ष ८ वें] फेब्रुवारी १९५४ [अंक ११ वा

अनुक्रमणिका

१ संपादकीय		१
पं. नेहरूंचें साहित्यिकांना मार्गदर्शन		
मराठी कादंबरी वाङ्मयावरील गाजलेली व्याख्यानमाला		
मराठी लेखक आणि आंतराष्ट्रीय प्रसिद्धि		
२ सुखसाधनांचें समायोजन	—प्रा. श्री. ना. बनहट्टी	३
३ द्वारका (लघुकथा)	—श्री. विश्वास कानडे	६
४ कांही कविता	...	९
शब्दामधली पहाट ये	—श्री. उ. रा. गिरी	
सावली	—श्री. बाबा मोहोड	
परी दूरचें क्षितिज	—श्री. रमेश वावगावकर	
मूक झालेल्या मनाला	—श्री. विश्वास	
दिसते छाया मला आपुलिच	—श्री. वसन्त निनावे	
होतें मनांत कांहीसें	—श्री. राजा मंगळवेढेकर	
'कालाच्या ठोवयांत'	—श्री. वामन इंगळे	
वरदान	—श्री. 'श्री'	
५ 'पिचलेल्या पाव्या'पासून 'सुवास आणि रसा' पर्यंत	—प्रा. सुरेश डोळके	१३
६ ग्रंथसमालोचन	...	१५
झिमझिम	—प्रा. कुसुमावती देशपांडे	
सारेच सज्जन	—सौ. इंदुमती शेवडे	
पदन्यास	—श्री. वसन्त वऱ्हाडपांडे	
माहेरवाशीण	—श्री. केशव केळकर	
७. संघवार्ता		२१

हें मासिक श्री. पां. ना. बनहट्टी यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ना. रा. शेंडे, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

यु ग वा णी

वर्ष ८ वें फेब्रुवारी १९५४ अंक ११ वा

सं पा द की य

पं. नेहरूंचें साहित्यिकांना मार्गदर्शन

दिनांक ५ जानेवारी १९५४ रोजीं 'मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलन, नागपूर' या संस्थेच्या हिंदी-भवनाची कोनशिला बसविण्याचा समारंभ, भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें मोठ्या उत्साहानें करण्यांत आला. त्यावेळीं हिंदी व मराठींतील अनेक प्रमुख साहित्यिक उपस्थित होते. प्रसंगाला उद्देशून पंडित नेहरू यांनी साहित्यासंबंधी अत्यंत मौलिक विचार प्रकट करून, साहित्यिकांना उत्कृष्टपणें मार्गदर्शन केलें. ते म्हणाले, "आजच्या युगांत, साहित्यांतील भाषेचा, सर्वसामान्य बोलण्यांत येणाऱ्या भाषेशीं निकटचा संबंध असला पाहिजे. त्या दोहोंत जर मोठा खंदक असेल, तर भाषा दुबळी होईल. साहित्य जर विदग्ध असेल तर त्यांत सौंदर्य राहील, पण जोम राहणार नाही. तें दरबारी साहित्य होईल. पण साहित्याचें कार्य नुसतें सौंदर्यप्रधान बनणें हें नसून लोकांना निरनिराळ्या कल्पना व विचार आकर्षकपणें कळविणें हें आहे....साहित्याने केवळ रंजन करून भागणार नाही; तर आज जगांत जे अनेक विषय उत्पन्न झाले आहेत व नित्य होत आहेत त्यांवर गंभीर-पणें विचार करून लिहिलेलीं ज्ञानप्रद पुस्तकेंहि भाषेंत निर्माण झालीं पाहिजेत. भाषा ही लादून कृत्रिम तऱ्हेनें तयार होत नसते. सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन व्यवहारांतून ती तयार होते व तीच जनतेची भाषा होय. फूल कांही कोणाच्या हुकुमानें उगवत नाही; तें आपोआप समय येतांच बाहेर पडतें. तसेंच भाषेचें आहे; जनतेच्या अंत:करणांतून ती प्रस्फुरित होत असते."

*   *

मराठी कादंबरी-वाङ्मयावरील गाजलेली व्याख्यानमाला

साहित्य संघाच्या सांस्कृतिक समितीद्वारें, गतवर्षी तिकिट लावून वाङ्मयीन व्याख्यानमाला घडवून आणण्याचा उपक्रम सुरू झाला. या आयोजनेच्या आरं-भालाच प्रा. ना. सी. फडके यांच्यासारखे ललित लेखक व प्रभावी वक्ते लाभल्यामुळे व्याख्यानमाला यशस्वी झाली. विषय मराठी मनाला आस्था असलेला, जिव्हाळा वाटणारा असा होता. मराठींतील नामांकित नाटककारांपैकी पांच नाटककारांवर—किर्लोस्कर, देवल, गडकरी, खाडिलकर आणि अत्रे—प्रा. फडके यांनी अत्यंत रसाळ अशीं व्याख्यानें देऊन श्रोत्यांना मुग्ध करून टाकलें. मागील वर्षाच्या यशानें उत्साहित होऊन वि. सा. संघाच्या सांस्कृतिक समितीनें तो उपक्रम चालू ठेवण्याचें ठरविलें. यंदाची व्याख्यानमाला गुंफण्यासाठी मराठींतील चतुरस्र ललितलेखक श्री. वि. स. खांडेकर यांना निमंत्रण देण्यांत आलें व त्यांनी तें स्वीकारल्याचें कळविलें. विषय पांच मराठी कादंबरीकार—हरिभाऊ आपटे, वामनराव जोशी. डॉ. केतकर, ना. सी. फडके व साने गुरुजी—हा होता. हें ज्ञानसत्र गणराज्यदिनीं सायंकाळीं ६ ला सुरू झालें व शुक्रवार खेरीज करून पांच दिवस चालू राहून तें रविवारीं रात्रीं ९ वाजतां यशस्वीपणें पार पडलें. व्याख्यानमालेच्या यशामध्ये

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. भाऊसाहेब यांचा भाग तर मोठा आहेच; तसाच नागपूरच्या रसिक व शिस्तीने वागणाऱ्या जनतेचाहि आहे. प्रा. ना. सी. फडके यांच्या कादंबरी वाङ्मयावरील व्याख्यानाच्या दिवशीं स्त्री-पुरुषांचा अलोट समुदाय लोटला होता. त्या दिवशीं घड्याळाने श्री. भाऊसाहेब खांडेकर यांना वेळेचें भान देण्याचें नाकारल्यामुळे व्याख्यान तीन तासांवर गेलें, तरी वृत्तींत चलबिचल होऊं न देतां, तितक्याच उत्साहाने व समरसतेने श्रोत्यांनी व्याख्यान ऐकून घेतलें. श्री. खांडेकर यांनी हरिभाऊ आपटे यांच्यावर बोलतांना कादंबरीचें कार्य, उत्कृष्ट कादंबरीचे निकष, रसग्रहणाची पद्धति इत्यादि गोष्टींची कल्पना देऊन अनुक्रमें पांचहि कादंबरीकारांच्या कादंबरी साहित्याचें मूल्यमापन त्यांनी केलें आणि डोळसपणाने कादंबरी वाचणारांना एक विशेष दृष्टि दिली. कादंबरीचें कार्य केवळ रंजनाचेंच नसून, कादंबरीचा अभ्यास किती विविध आणि मनोज्ञ होऊं शकतो याची खांडेकरांनी जाणीव दिली. मराठी वाचक कादंबरीचा विवेचक झाला तर कादंबरीसाहित्य जास्त मोलाचें आणि तोलाचें होईल. हा परिणाम झाला तर व्याख्यानमालेचें सार्थक झाल्याप्रमाणे होईल.

* *

तुमचें प्रकाशन साहित्यप्रेमी वाचकांना सादर करण्यासाठी

युगवाणींत जाहिराती द्या

लेखक, प्रकाशक व विक्रेते यांनी आपल्या नवीन प्रकाशनांच्या जाहिराती युगवाणींत अवश्य द्याव्या.

जाहिरातीच्या दरांसाठी

व्यवस्थापक, युगवाणी,
विदर्भ साहित्य संघ-कार्यालय,
उत्तर अंबाझरी रोड, नागपूर १.

या पत्त्यावर लिहा.

मराठी लेखक आणि आंतरराष्ट्रीय प्रसिद्धि

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशी भाषांना जशी प्रतिष्ठा येत चालली आहे तशीच भारतांतील निरनिराळ्या भाषांतील वाङ्मयाचा परिचय करून घेण्याची उत्सुकता भारताबाहेर वाढत आहे. याचाच परिणाम म्हणजे देशी वाङ्मयांतील निरनिराळ्या कृतींच्या अनुवादांना महत्त्व आलें आहे. देशी वाङ्मयासंबंधी परिचयलेखहि इंग्रजींतून मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होत आहेत. न्यूयार्क ट्रिब्यूनने सुरू केलेली जागतिक लघुकथा स्पर्धा, न्यूयार्कच्या ग्रोव्ह प्रेसची ललित वाङ्मयस्पर्धा, जोसेफ काल्मर या जर्मन गृहस्थाने भारतीय कथांचे अनुवाद मिळवण्यासाठी केलेले प्रयत्न, अटलांटा आणि परस्पेक्टिव्ह या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले अनुवाद, भारतांतील इंग्रजी नियतकालिकांत प्रसिद्ध होऊं लागलेले टीकालेख इत्यादींचा या संबंधांत उल्लेख करतां येईल. याच बाबतींत आणखी एक मुद्दा असा सुचतो की मराठी लेखकांचें इकडे विशेष लक्ष गेलें नाही. एक तर औदासीन्य आणि नाही तर विवाद्य प्रसिद्धि असा प्रकार घडूं लागला आहे. विवाद्य प्रसिद्धीवर उपाय एकच की निरनिराळ्या प्रवृत्तीच्या लेखकांनी इकडे लक्ष द्यावयास हवें. लहानलहानसे गट व त्यांतील परस्पर प्रशंसा यामुळे मराठी वाङ्मयाचें सध्याचें रूप किरटें झालें आहे. मराठी लेखक आपल्या लिखाणाचा जागतिक पार्श्वभूमीवर विचार करतील तर स्वतःच्या वाङ्मयाचें स्थान व महत्त्व त्यांना अधिक नीट कळेल असें वाटतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुखसाधनांचें समायोजन

श्रीनिवास नारायण बनहट्टी

(मागील अंकावरून पुढे)

सुधारलेलें आधुनिक जीवन इंद्रियांवर चोहोंकडून आदळणाऱ्या सुखसाधनांनी इतकें पर्याकुल झालेलें आहे की त्यांमुळे मानवी मनाची स्वस्थता आणि आनंदास्वादांतली लज्जत नाहीशी होऊं लागली आहे. पैशाच्या जोरावर सगळीं सुखसाधनें ज्याला संपादन करतां येतात अशा मूठभर नशीबवान माणसांपुढेच केवळ नव्हे, तर मोठमोठ्या शहरांतील सामान्य मनुष्यापुढे देखील आपल्या मनाचा ताजेपणा व संवेदनक्षमता कायम कशी ठेवावी, हा प्रश्न उभा ठाकतो. सिनेमा आहे, रेडियो आहे, रहस्यकथा कादंबऱ्या आहेत, पैसे लावून खेळण्याचे अड्डे आहेत. आणखी व्यसनांच्या सदरांत जमा होणाऱ्या उत्तेजक गोष्टी आहेत. परवाच्या गांधी जयंतीचा दिवस (२ आक्टो. १९५३) हा पुण्याच्या रेसेसचा दिवस होता. गांधी जयंतीच्या निमित्तानें जे कार्यक्रम झाले त्यांना त्यांना श्रोत्यांची पातळाई फार जाणवत होती. आणि सगळी गर्दी कुणीकडे लोटत होती म्हणाल तर रेसग्राऊंडकडे (शर्यतीच्या मैदानाकडे). रेसच्या नादांत पैसे मिळविण्याचा हेतु असतो; पण त्याच्याकडे लोक खेचले जातात ते त्याच्या तीव्र उन्मादकतेमुळे. सर्व उन्मादक व्यसनांचा हा गुण प्रसिद्धच आहे, की त्याच्या पासून जें सुख मिळायचें तें मिळण्यासाठी त्याचें प्रमाण एकसारखें वाढवीत न्यावें लागतें. त्यामुळे मनुष्याचीं अंगें व इंद्रियें हतबल व बोथट होतात.

श्रीमंत शेटजी किंवा वडचा ऑफीसचे मॅनेजर घराच्या बाहेर पडले की त्यांचें पाऊल मोटारींतच पडतें. ऑफीस वरच्या मजल्यावर असलें तर चढण्यासाठी उत्तोलक उर्फ लिफ्ट आहेच. शेजारच्या खोलींतल्या मुनिमाशीं बोलायचें असलें तरी खुर्चीवरील आसन ढळविण्याची जरूरी नाही; टेबलावरील फोन कानाशीं व तोंडाशीं लावला की झालें. रोजच्या सगळ्या दिनचर्येत पायांचा उपयोग जवळ जवळ शून्य ! शरीराला वाहून नेण्याकरितां म्हणून जो अवयव निसर्गानें दिला त्याचा, सुखसाधनांच्या विपुलतेमुळे, उपयोग करण्याचा प्रसंग म्हणजे गोल्डस्मिथने म्हटल्याप्रमाणे अक्षरशः निळ्या पिवळ्या बिछान्यावरून जाण्यापुरताच. देहधर्माकरितां चार पावलें अंगणांत जाणें भाग पडावें, म्हटलें तर तेंहि नाही ! बंगल्याच्या प्रत्येक खोलीला 'बाथरूम अटॅच्ड' असायचीच ! याचा परिणाम असा की साहेब (आणि बाईसाहेब) यांचे पाय दुबळे होऊन जातात. सांधेदुखी, स्नायूंची दुर्बलता, हृदयाची अशक्तता इत्यादि लक्षणें प्रकट होऊन शरीर भारभूत वाटूं लागतें. मग साहेब शहाणे असतील तर पहाटे गावाबाहेर शुद्ध हवेंत रपेट करण्यास जाऊं लागतात. म्हणजेच निसर्गानें दिलेल्या साधनांचा वापर करून त्याची क्षमता कायम राखणें त्यांना भाग पडतें. हें सुखसाधनांचें वैयक्तिक समायोजन होय.

भावना आणि मनोवृत्ति यांच्याशीं ज्याचा विशेष संबंध नाही, अशा शरीरव्यापाराचा वर उल्लेख केला. पण स्थूल शारीर व्यापारांकडून सूक्ष्म मानसिक सृष्टी-कडे लक्ष वळविल्यास तेथेहि तृप्तिसाधनांच्या गर्दीमुळे असलीच आपत्ति ओढवतांना दिसते. जिज्ञासा किंवा कुतूहल या मनोवृत्तीचें उदाहरण घेऊं, आपल्या भोवताली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काय चाललें आहे, आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांची, आपल्या गावाची, देशाची काय हालहवाल आहे हें जाणण्याची इच्छा माणसाच्या मनांत स्वभावतः असते. ती तृप्त करणाऱ्या साधनांचा भडिमार किती व्हावा, याला सध्याच्या सुधारलेल्या जीवनांत कांहीं सुमार राहिलेला नाहीं. पहाटे उठतो न उठतो इतक्यांत दोन चार वर्तमानपत्रें घरांत येऊन पडतात, त्यांत कुठल्या तरी गल्लींत नवऱ्यानें बायकोच्या थोबाडींत मारली इथपासून तों बर्म्यूडा बेटांत आयसेन हॉवरनें रशियाला कशी चपराक हाणली इथपर्यंत शेंकडो बातम्या आणि त्यांचा काथ्याकूट यांचें अस्ताव्यस्त प्रदर्शन नजरेसमोर उभें ठाकतें. दिवसांतून अनेकवार बातम्या सांगण्यास रेडियो सज्ज आहेच. दुपारचे ३ । ४ वाजतांत तों संध्याकाळचीं वृत्तपत्रें विकणाऱ्या पोरांच्या आरोळ्या कानांवर आदळूं लागतात. या सामग्रींतून लहान मोठ्या शेंकडो बातम्या इतक्या त्वरेनें आपल्या मेंदूवर आघात करीत असतात की त्यांच्या दंगलीनें आपलें मन गोंधळून जातें. आपल्याला महत्त्वाचें कोणचें, उपयुक्त कोणचें, सद्वृत्तींचें पोषण करणारें कोणचें व सद्वृत्तींना हानिकारक कोणचें, याचा विवेक राखणें कठीण होतें; आणि अखेर परिणाम असा होतो की आपली जिज्ञासा अथवा कुतूहल बुद्धि मरगळीस येते. रोगट पचनशक्तीच्या मनुष्याला ज्याप्रमाणें खमंग मसालेदार पदार्थाखेरीज कांहीं रुचत नाहीं, त्याप्रमाणें चटकदार, प्रक्षोभक किंवा पाचकळ हकीकती वाचण्याची चट लागूं लागते.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत बातम्या वाचणाऱ्या व ऐकणाऱ्या आजकालच्या सुधारलेल्या मनुष्यास आपल्या शेजारच्या घरीं कोणी आजारी किंवा अडचणींत असलें तर त्याची दाद नसते; त्याला त्याच्याविषयीं अनुकंपा व सहानुभूति तर राहोच, साधें कुतूहलहि नसतें, हा आधुनिक युगाचा खेदकारक दुर्विलास होय.

रसिकतेची व कलास्वादाची गोष्ट तशीच. संगीताची भरमार व्हावी ती किती? रेडियो आहे, ग्रामोफोन आहे, सिनेमा आहे, जलसे आहेत; हीं सर्व द्वारें एकसारखें गाणें ओकीत असतात. वाङ्मयाचेंहि तसेंच. दैनिकें आहेत, साप्ताहिकें आहेत, मासिकें आहेत, रहस्यकथा आहेत; या सगळ्यांतलें सकस कोणतें, फोलकट कोणतें, मनोवृत्तींना पोषक कोणतें व घातक कोणतें, याचा विवेक करणार कसा व केव्हा? सटरफटरांतून दृष्टि पलीकडे जाऊन सत्त्वशाली अक्षर वाङ्मयापर्यंत पोंचेल तेव्हा!

ही धावपळ थांबणार कशी? या धावपळींतून इंद्रियांची संवेदनक्षमता, मनोवृत्तींचा तजेला आणि अभिरुचीचा चोखंदळपणा कायम कसा राखायचा? आगगाडींतून किंवा मोटारींतून अत्यंत वेगानें जातांना बाहेर सर्व सारवल्यासारखें दिसतें; एखादें दृश्य न्याहाळून त्याचें सौंदर्य नजरेंत साठवण्याइतकी स्वस्थता कधीच लाभत नाहीं; तशी आज सुधारलेल्या मानवाची स्थिति झाली आहे. एका वैराग्याची अशी गोष्ट सांगतात की तंबाखू, चरस, माजूम इत्यादिकांचें अखंड सेवन करून त्याची जीभ अशी झाली होती की जणूं सकलादीचा तुकडा. कोणच्याहि पदार्थानें त्याला नशा येईनाशी झाली तेव्हा त्यानें एक नागीण बाळगली; तिजकडून तो आपल्या जिभेला चाववून घेई तेव्हा कुठें त्याला थोडी नशा चढून बरें वाटे. इंद्रियोपभोगसाधनांच्या भरमसाट तारतम्यशून्य उपयोजनामुळें सुधारणाशिखरावर डौलानें मिरवणाऱ्या माणसाची स्थिति वरील वैराग्यासारखी होऊं घातली आहे की काय, असें वाटूं लागतें.

वाङ्मयाच्या प्रांतांतली एक प्रवृत्ति लक्षांत घेऊं. एक काळ असा होता की ज्या वेळीं मनोरंजन, नवयुग, रत्नाकर यांच्यासारखीं मासिकें डौलानें चालत असत. आशय व शैली दोन्ही दृष्टींनी वाचनीय असें पुष्कळ साहित्य त्यांतून प्रसिद्ध होई. बातम्यांची वाहक त्यावेळीं बहुतांशीं साप्ताहिकें होतीं. केसरी, काळ इ० साप्ताहिकांमध्ये उच्च दर्जाचें लिखाण प्रसिद्ध होत असलें तरी तें बहुतांशीं राजकीय स्वरूपाचें किंवा तात्कालिक विषयांस धरून लिहिलेलें असें असे. दैनिकांचें प्रचलन फार थोडें. ही पूर्वीची गोष्ट झाली. यांत्रिक सुधारणांच्या घोडदौडीमुळें आता कशी स्थिति झाली आहे हें लक्षांत घेणें मौजेचें आहे. दैनिकांचें प्रचलन इतकें वाढलें आहे की त्यांनी मासिकांना जगणें तर कठीण करून सोडलें आहेच, पण साप्ताहिकांनाहि गिळून टाकलें आहे. सर्व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दैनिकें आता विविध विषय विभाग किंवा ' मॅगेझिन सेक्शन ' आठवड्यांतून एकदा प्रसिद्ध करतात, त्यांत मासिकें व साप्ताहिकें यांत येण्याजोगे लेख देतात. इतर वारींहि सवडीनुसार असे लेख दैनिकांत येतातच. त्यामुळे दोन्ही बाजूंनी हानि कशी होत आहे हें पाहण्याजोगें आहे. दैनिकाचे लेख तयार करण्यास अवकाश अगदी थोडा, त्याचें स्वरूपहि क्षणभंगुर—त्यामुळे लेखकांकडून व्हावें तसें मनन होत नाही. वाचकांची वृत्तिहि तशीच. धरधरींत, पांगलेल्या मनःस्थितींत, पुष्कळशा सटरफटर मजकुरावरोवर कांही चिरस्थायी लिखाणाचें वाचन व्हावयाचें. धड वाचलें न वाचलें अशा स्थितींत, त्या कागदाचा चोळामोळा किंवा फाडाफाड होऊन त्याची वासलात लागणार. या परिस्थितींत लेखकाचें लेखनसामर्थ्य आणि वाचकाचें आस्वादनक्षमत्व वाढेल की घटेल, याचें अनुमान करावयास मोठा तर्कशास्त्री नको.

या एकंदर परिस्थितीवर तोड काय ? निसर्गवादी तत्त्वज्ञांच्या उपदेशानुसार सुखसाधनांच्या बहूभवनाकडे पाठ फिरवून निर्भेळ नैसर्गिक जीवन जगावयाचें की काय ? आगगाडी, मोटार, तारायंत्र, रेडियो, हें सर्व नको; इतकेंच काय, छापायचीं, शिवण्याचीं, धुण्याचीं इत्यादि यंत्रेंहि नकोत; कपडा नको, चाकाचें वाहन नको, लिहिलेला मजकूरहि नको—कारण हे सर्व माणसाच्या यांत्रिक प्रगतींतलेच टप्पे आहेत व त्यांमुळे तेवढ्यापुरता निसर्ग माणसाला दुरावला आहे !

निर्भेळ निसर्गवादाची असली हाक लाखांतून कोटींतून एखाद्या तपस्वी साधूने ऐकली, तरी एकंदर मानवजातीला ती ऐकणें परवडणार नाही. रस्किन, गांधी प्रभृतींचा अर्धामुर्धा निसर्गवादहि प्रसार पावत आहे असें दिसत नाही. पण त्यांतील मुख्य तत्त्व तरी मानवांच्या वृत्तींत रुजलेंच पाहिजे. या तत्त्वाचा आविष्कार फार काळापूर्वी मनूने करून ठेवला आहे.

वशे कृत्वेन्द्रियग्रामं संयम्य च मनस्तथा ।
सर्वान्संसाधयेदर्थानक्षिण्वन्योगतस्तनुम् ।।

" इन्द्रियें ताब्यांत ठेवून आणि मनाचा संयम करून योगाने शरीरसामर्थ्य कायम राखून चारी पुरुषार्थांचें चांगल्यां रीतीने साधन करावें. " यांत संयमाची कल्पना महत्त्वाची आहे. संयम म्हणजे अजीबात प्रतिबंध नव्हे. आपलें उद्दिष्ट साधण्यासाठी जरूर असेल त्या वृत्तींना जरूर असेल तेवढ्या प्रमाणांत वाव देणें, म्हणजे संयम. उद्दिष्टामध्ये सर्व अर्थांना मनूने गोवलें आहे. त्यांत धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारी पुरुषार्थ येतात. पहिले तीन धर्म, अर्थ, काम म्हणजेच मनुष्याचें ऐहिक जीवन. हें उत्कृष्ट रीतीने सफल होण्याकरितां देखील संयमाची जरूरी आहे.

संयम, योग या शब्दांना अध्यात्माची डूब आहे. पण त्यामुळे विचकण्याचें कारण नाही. आपण पाहिजें तर 'समायोजन' हा शब्द वापरूं. इंग्रजींतील adjustment या शब्दास हा प्रतिशब्द बनविलेला आहे. पूर्वीपासून अस्तित्वांत असलेल्या गोष्टींना नव्याने उद्भवलेल्या परिस्थितीशीं जुळेल व आपलें उद्दिष्ट साधेल असें वळण देणें म्हणजे adjustment किंवा समायोजन. मानवाच्या मनोवृत्ति, भावना या सर्व पूर्वीच्याच आहेत. त्यांत कांही बदल झालेला नाही. मानवाला उपलब्ध असलेला अवकाशहि तितकाच आहे. मानवाचें उद्दिष्ट समाधान किंवा सुख हेंच आहे; तेंहि बदललेलें नाही. सुखाच्या जड साधनांचें मात्र एकसारखें बहूभवन चाललेलें आहे. एकच परिमाण बदललें आहे व बाकीचीं स्थिर आहेत. तेव्हा हें त्रैराशिक अवघड वाटण्याचें कारण नाही, गरिबींत वाढलेल्या माणसाला श्रीमंती आली म्हणजे तो आपल्या घरांत नानाप्रकारच्या मूल्यवान वस्तु आणून भरतो. परंतु सर्व गोष्टींची व्यवस्था लावणारें कोणी माणूस नसल्यास सर्वत्र व्यवस्थितपणे माजलेल्या पसाऱ्यानेच तें घर खायला उठतें. योजकता असलेल्या चतुर गृहिणीचा हात सारखा फिरत असला की त्याच वस्तु त्याच जागेचें सौंदर्य वाढविण्यास कारणीभूत होतात. मानवी संस्कृतीची आज हीच अवस्था झाली आहे. समायोजनाच्या अभावीं तिला वकाली बाजाराची कळा येऊं पाहत आहे. जसजसें समायोजन होईल तसतसें रेखीव व पद्धतशीर मांडणी केलेल्या बहुप्रयोजन भांडाराचें उर्फ 'मल्टि परपझ स्टोअर'चें वांछनीय स्वरूप तिला प्राप्त होईल.

(पुढील मजकूर पान ३० वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

द्वा र का

विश्वास कानडे

द्वारका पांगळी होती. लहानपणापासून पांगळी होती. तिची जीभ वळत नसे. तोंडांतून शब्द पडत नसे. वॅं वॅं करीत ती पाळण्यावर बसून राही. ओठावरून लाळ गळे. दोन्ही पाय गेले होते. गुडघ्यांत जान नव्हती. झोकांड्या खात चाले. हातापायांचा ताळमेळ नसे. तोल सांभाळण्यासाठी हातांची विचित्र हालचाल करावी लागे. तशी रूपाने ती बरी होती. पण त्याचं काय ? लहानपणचं ठीक होतं. काकू सगळं करून द्यायची. झगा घालून बंगईवर बसवून दिलं की द्वारका लाह्या खात बसली राह्यची. हळूहळू झोके घ्यायची. इकडे तिकडे बघायची. बबन उठला का म्हणून वॅं वॅं करीत खुणेने काकूला विचारायची. तो लहान होता. त्याच्यावर तिचं भारी प्रेम. तो उठला, की चहा पाजून काकू त्याला तिच्यापाशीं खेळायला पाठवून देई. त्यालाहि समजूं लागलं होतं. अक्काला झोके घेतां येत नाहीत म्हणून तो उतरून तिला झोके देई. द्वारकेला बरं वाटे. ती समाधानानं त्याच्याकडे बघे. पण मग तो खेळायला निघून जाई. काकू कामांत असे. बाबा कामावर निघून जात. मग द्वारकेची तळमळ होई. चिमणी दाणे वेची तें बघत राही. आईला आरसा मागे. कपाळाला कुंकू लावी. केस सारखे करी पण त्यांत फारच थोडा वेळ जाई. मग ती मुकाट्याने खाली पाहात राही. कधी त्रासल्यासारखं करी नि रडूं लागे. काकूचं लक्ष गेलं की ती तिला पोटाशीं घेई. तीहि रडे. पोरीचं कसं होईल ह्या चिंतेंत तिचा सारा दिवस जाई. काकूचा आदळ कमी झालेला लक्षांत आला तर शेजारच्या रमाबाई लगलग त्यांच्याकडे येत. "हें हो काय काकू ! असं वेड्यासारखं तें काय करायचं !" त्या डोळे पुशीत. त्यांची समजूत काढीत. देवाचं फळ आहे तें, असं म्हणत. कधी म्हणत, "द्या काकू, मी घेऊन जातें द्वारकेला आमच्या घरीं. वसंताला खेळायला सांगतें तिच्याशीं." इतका वेळ भिरभिर पाहत असलेल्या द्वारकेला हें समजायचं. त्या वेडसर डोळ्यांत आनंद चमकायचा. ती वॅं वॅं करून कांही सांगायची. रमाबाईंना कळत नसे. मग काकू समजावून सांगे — "लाह्या देईन वसंताला, म्हणते आहे." त्यांचा ऊर भरून येई. रमाबाईंकडे असं क्वचित् जायला मिळे. रोज बंगईवर बसूनच दिवस काढावा लागे. दुपार होई. काकू तिला जवळ घेऊन जेऊं घाली. तोंडांत घास नीट जात नसे. बबन हसत नसे. त्यालाहि समजूं लागलं होतं. पण कधीकधी तो तिच्याबरोबर खेळत नसे. बंगईवर बसत नसे. आई रागें भरी. मग पुनः खेळूं लागे. द्वारकेला बरें वाटे.

द्वारका वाढत होती. पण दिवसांमध्ये फरक पडत नव्हता. तीच बंगई, त्याच चिमण्या. त्याच लाह्या, तोच आरसा. ती जसजशी वाढूं लागली तसतशी जास्त करुण दिसूं लागली. लहान असतांना हसली तर बरें वाटे, समाधान वाटे. पण आता समाधानच नव्हतं तर तिला हसूं कसं येणार ? हसली तर ती अधिक करुण वाटे. बघणाऱ्याचा गळा दाटून येई. काकू तर अक्षरशः रडत. त्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत चालली. तिला कांही शिकवतांहि येत नव्हतं. तिचीं बोटेंच वळत नसत. बाबांनी चार चांगल्या डॉक्टरांकडे विचारपूस केली. डॉक्टरी इलाज अशक्य होते. हें असंच राहणार होतं. उगाच खंत बाळगण्यांत काय अर्थ, असं ते काकूला सांगत. पण काकूला राहवत नसे. द्वारकेला लिहितां–वाचतां तरी यावं असं तिला वाटे. या जगांत सूर्य उगवण्यापलीकडे नवीन कांही घडत नाही. चाललं आहे तें चालत राहतं पण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माणसाला मात्र वाटतं.......काकूलाहि वाटे. एखादा साधुपुरुष भेटेल, अंगारा धुपारा देईल, माझी पोर चांगली होईल. कमींतकमी पांगळेपणा जावा. स्वतःच्या पायांवर उभं राहतां येईल. पण यांतलं कांहीच घडलं नाही. दिवस जात–वर्षं जात. द्वारका उंच झाली. झग्याचा परकर आला पण झग्याप्रमाणे परकरहि नेस-वावा लागे. समज वाढली होती. तिला वेगळं दुःख होऊं लागलं. परतंत्र जगण्याची पहिली सुई बोचली—आपल्याला परकर नेसतां येत नाही. बखनसारखं वाचतां येत नाही. आता वंगईवर बसून ती खंत करूं लागली. चिमणीकडे आसुसून बघूं लागली. वेगळ्या अदबीने ती केस सारखे करी. त्यांत जबाबदारीची जाणीव प्रकट होई. हिरमुसला चेहरा घेऊन ती इकडे तिकडे बघत राही. झाकपाक करणाऱ्या काकूंबरोबर तिची नजर हाले. लुगडं वाळत घालायला काकूंनी काठी वर उचलली की तिची नजरहि वर जाई. मग त्या अकारणतेची जाणीव तिला चटकन् बोचे. हा वेंधळेपणा आहे याची अस्पष्टशी जाणीव तिला टोचूं लागे. तरी तिला कांही सांगतां येत नसे. आंतला त्रास आंतच राही. चेहरा कोमेजून जाई. वेंधळेपणा वाढे. संध्याकाळी काकू तिला अंगणांत आणून बसवे रस्त्या-वरची रहदारी बघेल, तेवढाच विरंगुळा, असं तिला वाटे. पण त्याचा परिणाम अगदी उलट होई. स्वतःच्या अपंगतेची जाणीव जास्त तीव्र होई. सगळीकडे धावपळ दिसे. गति दिसे. चेतना दिसे. त्या बालमनाला स्वतःची विसंगति जाणवे. कधीकधी आंतून एकदम प्रश्न येई—कां? पण त्याचं अवसान नुसत्या वेंवें करण्यांत होई. डोळे करुण होत. झोप हेंच फक्त तिचं सुख होतं.

पण द्वारका आणखी मोठी झाल्यावर तेंहि सुख राहिलं नाही. पंधरा–सोळा वर्षांच्या द्वारकेला विचार फुटले होते. दिवसाबरोबर रात्रींहि ती विचार करीत राही. डोळे पांगळत तेव्हाच ती झोपे. तोपर्यंत मनांतल्या मनांत कुढत राही. तोच तोच विचार पुनः करी. लुगडंहि काकूच नेसवून देई. अटोकाट प्रयत्न करून ती आता स्वतःच्या हातानं जेवूं लागली होती. पण बाकीचं सगळं काकूलाच करावं लागे. काकू आता थकली होती. कधी कधी ती रागवे. अगदी चिडून जाई. मग द्वारकेची खंत पुसूं नका. डोळ्यांचं पाणी खळत नसे. पण लपवून ती अश्रू पुसे. अंथरुणावर पडली की त्यांना मोकळी वाट मिळे. आता बखनहि आपल्यांतच दंग असे. कधी कधी घरांत कुणी पाहुणा येई. सगळे तिची कीव करीत, ममता दाखवीत त्याचं. तिला अतिशय दुःख होई. काय हवं, काय नको हें तिला सांगतां येत नसे. इतका विचित्र कोंडमारा होई; पण करणार काय? दैवावर हवाला ठेवून दिवस कंठावे झालं, येवढं जरी तिला कळलं असतं तरी ती सुखी झाली असती. पण तेवढं तिला कळत नव्हतं. अगदी या शब्दांत जरी नाही, तरी आपल्याला अन्याय झाला आहे, हें तिच्या लक्षांत आलं होतं. पण आपला गुन्हा काय हें तिला कोणी सांगत नव्हतं. आप-ल्याला ह्या यातना कां? नकळत प्रश्न तयार झाले होते. नकळत विव्हळता लक्षांत आली होती. पण सगळं त्या एका निरर्थक वेंवेंत विरून जाई.

नुसती व्यथा पुरवली. पण तिची जाणीव नको. द्वारकेला जाणीव झाली होती. माणसांच्या क्रियांचे अर्थ–त्यामागचे हेतु तिला समजूं लागले होते. त्याच्या साह्यार्थ निवडक प्रसंगांच्या आठवणी तिचं मन निवडूं लागलं होतं. घटना आठवत, त्यांचे अर्थ स्पष्ट होत. कधीतरी जिन्यापाशीं द्वारका ठेचाळून पडली नि कामांत असलेल्या काकूने आततायीपणे तोंड सोडलं. कधीतरी मोरींत पाय घसरला नि बाबांच्या कपाळावर तिरस्का-राची छाया आली. कधीतरी बबनला झोके द्यायलां सांगितलं नि खेळायला जायला अडथळा आलेल्या त्याच्या चेहऱ्यावर "काय बुवा हा त्रास!" चे भाव उमटून गेलेत! निवडक प्रसंग. अपंगतेच्या जाणीवेची दाहकता वाढली. मन ओर-ओरडून विचारूं लागलं—कां? काय केलंय् मी? कां हा छळ माझा? कां हा माझा सूड? पण सगळं कांही एका अर्थशून्य वेंवेंमध्ये विरे. लहानपणचं काकूला कळत होतं. आता तें कळत नसे. तिला वाटे, पाणी हवंय् पोरीला. ती पाणी देई. मग द्वारकेच्या करुणेची दारुणता पराकोटीला जाई. ती घटाघटा पाणी पिऊन टाके. जणूं त्यांत सगळे प्रश्न विरघळूं शकत होते. जणूं त्यांत सगळ्या ज्वाला विझूं शकत होत्या.

मग एके दिवशीं नवीनच घटना घडली. मावशी, तिचे यजमान, नि त्यांची सुमन टांग्यांतून उतरलीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काकूच्या आनंदाला पारावार राहिला नाही. बहिणीच्या एकुलत्या एक लाडक्या मुलीचं येवढ्या थाटांत लग्न झालं, पण आपल्याला जातां आलं नाही, त्याचं दुःख ती विसरून गेली. सुमनच्या रसरशीत अंगावर अजूनहि लग्नाचं कोरं होतं. कानांत मोत्याच्या कुड्या होत्या—गळ्यांतलं तर किती सुरेख घडवलं होतं ! दोन दिवस आनंदांत गेलेत. गोड खाण्यांत गेलेत...... नि मग द्वारकेच्या लक्षांत एक नवीन गोष्ट आली. परवा काकू रडत होती मावशीजवळ. आंधळ्याला वासानंहि कळतं तसं तिला सगळं उमगलं होतं, समजलं होतं. माणसाच्या आयुष्यांतील आणखी एका नवीन आनंदाकडे तिचं लक्ष वेधल्या गेलं होतं—नि नेहमीप्रमाणे अपंगतेच्या असंख्य सुया तिला टोचून गेल्या होत्या. तें अशक्य होतं. तिचं लग्न होणार नव्हतं म्हणूनच तर काकू रडत होती. हुरहूर लागण्यापूर्वीच निघली. करपणाऱ्या मनाला आणखी एक भेग गेली. आवेगानं तिला हुंदका आला. आला आणि निमाला. दुःखाच्या कढांना यापुढे अर्थच नव्हता. पण दिवसा इतक्या सहजपणें दुःख स्वीकारतां येत नव्हतं. तिला अन्याय करण्यांत आला होता. तिचा गुन्हा नसतांना तिला शिक्षा ठोठावण्यांत आली होती. तिचा मूक प्रश्न होता—कां ? कां म्हणून ?

आणि तें आता तिच्या जीवनाचं एकमेव कोडं बनून गेलं होतं. तिचा सगळा वेळ त्या कोड्याच्या अटूट भिंतीवर डोकं आपटण्यांत जाई. तिचं लक्ष नसे. तिचं मन गुंग असे. भरकटत राही. अस्वस्थ असे. तगमगत राही. सुचेनासं झालेल्या तिला मग पुन: सुचेनासं होई. कुठेतरी हें कोडं फुटलं पाहिजे ! फुटलं पाहिजे ! ! पण ह्यामुळे तिचा वेंधळेपणा वाढला. काकूला चीड येऊं लागली. शांत बसून कां राहत नाही ही, तिला वाटे. पण द्वारका घरभर भटकत राही—एखाद्या अशांत आत्म्याप्रमाणे. तिचा त्रास तिला स्वस्थ बसूं देत नसे. वें वें करणं सारखं चालू राही. काकू दरडावे. गप्प बैस, म्हणे. आता द्वारकेच्या पुरेपूर लक्षांत आलं होतं. ती कुणालाच नको होती. तिचं प्रत्येकाला ओझं होत होतं. तिच्यावरची माया संपली होती. लोभ सरला होता. भोग नशिबाचा, म्हणून सगळे सोसत होते. ती रात्रीं-बेरात्रीं उठे. बंगईवर बसे. वें वें करीत राही. तिच्या एकमेव कोड्याला सोडविण्याचा तो खुळा प्रयत्न काळ्या रात्रीं करुण वाटे. अशांततेला मिळणाऱ्या शारीरिक हालचालींच्या वाटा इतरांना त्रासदायक वाटत पण ती कांहीच करूं शकत नव्हती. प्रश्न सोडवायलाच हवा होता. उत्तर मिळायलाच हवं होतं ! पण तोंपर्यंत हें असंच राह्यचं होतं. ह्याच यातना; ह्याच त्रास. काकूची चिडचिड वाढली. द्वारकेची धडपड तिच्या डोळ्यांत अश्रू आणीत नसे. आता अगदी क्रूर विचार तिच्या डोक्यांत येत. पण ती गप्प बसे. कधीकधी फारच झालं तर त्रासून जाऊन म्हणे, " मेलीला एखाद्या सोजिरान पळवून नेलं तरी बरं. " ती तिची आई होती ह्याला तिचा इलाज नव्हता. अगदी अस्सं वाटे तिला. याहूनहि क्रूर विचार तिच्या डोक्यांत येत. तिचं दुःख तिला बघवत नसे. मायेलाहि मर्यादा असतात.

द्वारकेला तें ऐकूं आलं. विशिष्ट गोष्टी तिला न चुकतां ऐकूं येत. न चुकतां समजत, उमगून जात. वाढणाऱ्या तगमगीची शीग वाढतच होती. अनुत्तरित कोडं अनुत्तरितच होतं. भिंत फुटण्यासारखी नव्हती. प्रश्न सुटण्यासारखा नव्हता. पण मग काय करायचं ? हा त्रास, ह्या यातना ? ह्यांचं उत्तर मिळत नव्हतं. ह्यांतला न्याय कळत नव्हता. नि तें कळत नव्हतं म्हणून त्रास अधिकच वाढत होता. करवतीने हृदय कापल्यासारखं वाटत होतं. नि तें थांबवतां येत नव्हतं. त्यापासून दूर जातां येत नव्हतं. इतरांना न दिसणाऱ्या ह्या भिंती फोडतां येत नव्हत्या.

नि मग एके दिवशीं रात्रीं ह्या भिंती फोडण्याचा मार्ग तिला सापडला. ती अंथरुणावर पडली होती. दीड वाजायचा सुमार असेल. काकू, बाबा केव्हाच झोपले होते. सगळ्या शांत वातावरणांत आपल्या मनांतल्या सैराट वाऱ्यावर बसून द्वारका ह्या भिंती फोडायचा प्रयत्न करीत होती. थकत होती, पुन: प्रयत्न करीत होती. पुन: थकत होती. अशी थकून निपचीत पडली होती. वेंवें बंद झालं होतं. हातापायांची चाळवाचाळव बंद झाली होती. तिच्या मनांत खोल खोल

(पुढील मजकूर पान ३० वर)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कां ही क वि ता

शरदामधली पहाट ये —

आरस्पानी दिशा ओलसर
गार कुसुंबी लहरत वारा
अर्धउमलल्या फुलवंतीवर
दंवथेंबांचा ठिबके पारा.

स्वप्नमग्न जलवंतीच्या उरिं
अस्मानाची निळसर छाया
क्षितिजापाशीं दावित मिरवित
शुक्रचांदणी तांबुस माया.

तळीं सांडलें प्राजक्तीच्या
शुभ्र लालसर पुष्प–चांदणें
हिर्व्या पानां आडुन लाजत
कुठे गुलाबी उमलें गाणें.

शहारली धुंदीत चंदनी
ही लसलसती निर्मळ हिर्वळ
तृणपुष्पांचे भृंग हुंगती
या मातीचा ओला दर्वळ

नीरवतेचें निळें रसायन
निघे न्हाउनी तयांत धरती
अबोध नीतळ तलम नभांतुन
स्निग्ध जांभळी झरते कांती.

पूर्वेची मळवाट थरारे
तिला केशरी लागे चाहुल
शरदामधली पहाट ये हळु
जपुन रेशमी ठेवित पाउल !

—उ. रा. गिरी

सावली

झाडाच्या बुंध्याशीं
पेंगली सावली
पेटल्या उन्हाच्या
भोवती मशाली

जळत्या वायूचा
कातर उसासा
कापीत चालला
क्षितिजाची रेषा !

फांदीच्या गर्भांत
कोवळी पालवी
जीवन–संगीत
लयींत चालवी
पंखाच्या मायेंत
पेंगलीं पाखरें
वर्षती वरून
उन्हाचे निखारे !

झाडाच्या बुंध्याशीं
इवली सावली
श्वासांत कण्हत
बिचारी पेंगली
झिंगलें जीवन
भंगल्या दुपारीं
घर्गीत विरल्या
संगीत–लहरी !

बिचारी सावली
कण्हते घर्गीत
फांदींत उमलें
जीवन संगीत
नवीन आकांक्षा
नवीन जीवन
नवीन पालवी
नवीन दर्शन !

—बाबा मोहोड

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परी दूरचें क्षितिज--

जरी भयाण शांतता
खिन्न पोकळी व्यापुन
पसरली अस्ताव्यस्त
धुकें जाड पांघरून

जरी काळवडलेंच
मुख अजून नभाचें
सुरू उच्छ्वास अजून
उष्ण उष्ण विरहाचे :

परी...दूरचें क्षितिज
गोड भैरव आळवी--
नभ उत्स्फूर्त क्षणांत
कोष तेजाचे उकली !

—रमेश वाबगांवकर

मूक झालेल्या मनाला--

मूक झालेल्या मनाला
स्पंदन हवें स्पंदन हवें;
हवी भावना, हवी कामना
किंचित् हवी बोच हृदयीं
पापणींत थरथर हवी
अन् वेळ संध्या–कातर हवी– १

श्वास आहे उष्णसा हा
पोंच त्याची हृदयीं हवी,
उमलणार आहे–नाही
दखल ह्याची किंचित् हवी,
ओठावर सूर हवा
अन् चांदणी निर्भर हवी-- २

शब्द नाही शुष्कसा हा
ओल त्याची हृदयीं हवी,
कळणार आहे–नाही
उकला ह्याची किंचित् हवी,
कशिद्यावर सुई हवी
अन् तीहि तेथे अस्थिर हवी– ६

जखम आहे, दुःख आहे
कधी त्यावर फुंकर हवी
उमजणार आहे-नाही
विकल त्याची ओढ हवी,
अन् क्षण क्षण–कणकण
जळणारी उजळणारी पणती हवी ४

--विश्वास

दिसते छाया मला आपुलिच

मनांतल्या ऋजु　　वीणेमधुनी
प्रीती भक्ती　　वात्सल्याचे
दया क्षमा अन्　　दाक्षिण्याचे
क्षणाक्षणाला　　उठती जे जे　　उर्मिल सूर
करितों त्यांचें　　उद्गायन मी　　विश्वापुढती
मुग्ध निरामय.
परी तयांवर　　विश्व ठोकतें　　तत्परतेने
"शुद्ध ढोंग ! " ही　　कर्कश मुद्रा;
आणि फिरविते　　निर्मम अपुली　　पाठ मजकडे.
कळे न मजला　　अर्थ तयाच्या　　या कृत्याचा;
आणि माझिया　　मनांत येई
विश्वाचे हे　　रोगट डोळे　　काचिळल्यागत
नित्य पाहती　　जिकडे तिकडे
कां हा उर्मट　　पिवळा संशय ?
अकस्मात तों
दिसते छाया　　मला आपुलिच
वेडीविद्री　　हिडीस बेढब　　हिंस्त्र भयानक ! !
आणि माझिया　　हृदयामधला
भावमृगांचा　　व्याकुळ तांडा
महिष यमाचा　　जणू पाहुनी
भिऊन पळतों　　कैक योजनें ! !

—वसन्त निनावे

होतें मनांत कांहीसें

होतें मनांत कांहीसें
　बोलायाचें तुझ्याशींच
　　आले होतें तयारीने
　　　मनांतल्या हेतूनेच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कसें पुसायचें तुला ?
कशी शब्दांची कुसर ?
कांही केल्या जमेनाच
कसा पडतो विसर !

तुझ्या खटचाळ डोळ्यांत
चूर होतें अवसान
तुझ्या मुग्ध सान्निध्यांत
घेतें तुझेंच ऐकुन !...

—राजा मंगळवेढेकर

'कालाच्या ठोक्यांत'

कालाच्या ठोक्यांत
साठलें स्पंदन
प्रीतपूर्तिचें
आर्ष आक्रंदन १

कालाच्या ठोक्यांत
विश्वाची गती
गतिशून्य विश्वाची
भंगली मूर्ती— २

कालाच्या ठोक्यांत
स्मृती कालची
स्वप्निल कालौघीं
आशा उद्याची— ३

कालाच्या ठोक्यांत
प्रतीक्षा धडधड
उद्याच्या 'समेचा'
आज हा 'काल'— ४

कालाच्या ठोक्यांत
सूची 'पळांची'
जातों मी 'येतों'
प्रतीक्षा उद्याची— ५

—वामन इंगळे

वरदान

क्षीरसागराचें
सुरासुरांनी मंथन केलें,
चवदा रत्नें त्यांत हलाहल
बल दोन्ही भ्याले.
द्रविणमयी त्या अग्निशिखेचें
प्राशन करुनी
नीलकंठ मी
भोळाशंकर
हो प्रलयंकर,
रुद्र भयंकर
मी तांडवकर,
तृतीयनेत्र मम
सोडि अग्निशर,
डमडम डमरू भैरव गाहून,
गेले खवळुन वीरशैवगण,
घडधड घडके होमकुंड तें
तडाड् तडके ज्वलंत दामिनी,
कड्ड्ड् पडतां गगनमंडपीं
कोटिप्रभेचे सूर्य जाहले
ठिकऱ्या ठिकऱ्या
महाकालही भयभित होतां
तप्ततेजरस ओकुं लागले
स्थितप्रज्ञेचे मेरुपर्वत,
भस्मराशिही उधाणल्यावर
वातप्रभंजन शंखनादकर
सप्तसुरांवर
आसुड ओढित रों रों गर्जत
गद्गद् दिग्गज लोळवि दाही !
सोडी सागर निजमर्यादा,
करी नर्मदा
चूर्ण अस्थींचें संगमरवरी
देव अदेवही तेथ निमाले
भेद नुरे की राहू—मंगल,
नऊचंद्राचा साज गुरूचा
तेजोकंकण शनैश्चराचें
खंडित मंडित विश्व अणूंचें
रूप प्रसाधन शुक्रप्रभेचें
हृदयस्पंदन दिनरजनीचें
विरुनी गेलें
स्वर्गलोक पाताळ ! १

✳

आणि तरीही——
मी शिवसुंदर !
उदयगिरीवर
सुवर्ण झळके,
सद्यस्नात हो राऊळ मळके
गर्भवती या वसुंधरेचें

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मृगजलपानीं रसरसलेलें
हिरवें मंडन,
घंटा घणघण पूजन–अर्चन
मनमंदिरिं आशांचें नर्तन,
वमन मुळिही झालें गरल न
गहननीळ तें कंठीं थिजलें !
मम विषपानीं
नीलकंठता व्यापि चराचर—
नीलनीलिमा अवकाश भरे,
घन भूवरती शामल विहरे,
निळ्या जळांनी सागर लहरे,
हिमालयाच्या तुंगयशावर
गोठून जमल्या
नीलनभांच्या स्वप्नील शिळा,
मृत्युंजयपथ वीरगतीचा
उजाळलेला
नीरवशांतशा नीलप्रभेने २

✳

मातीच्या पणत्या—
भरल्या त्यांतुन हिमजलराशी,
वळवळ वाती
अश्रु शोषिती
शिणली दीप्ती,
कडाकाजळी लीन कोटरीं,
खळगे पोटीं जीर्णकाष्ठवत्,
अधर वाळके
लाल जिभेची भिजवित राही,
जळे शलभही व्यर्थ धडपडे,
क्लीब क्लिन्न मन उर विच्छिन्न,
धूर घुटमळे छतांछतांतुन,
राहे कोंडुन
सडका कुजका शव दुगध
सदावर्तनीं पुष्ट पोसल्या
कीटाणूंच्या पिढ्या
जगण्यासाठी उलटचासुलटचा
क्षुद्र हृदयींच्या पडती उड्या !
शांतम् पापम् अंधरांतून
चालें जपजाप
हौतात्म्य यायचें मग आपोआप ! ३

✳

घे तूं पिउनी आकंठ अर्गला
युगयुगाचा तूं रखवाला
घे घोट विषाचा
मुळिं न करी क्षण अनमान,
जीर्ण आशयीं कुजलेलें जल व्यर्थ तयाचें पान !
तिमिर कसोटी भेदिल ऐसा सोड दृष्टिशर
आभाजल मग फुटुनी वाहिल,
लाल फुलांनी कंठ सतविता
चेतन करुनी पिचलेला रव
सजवुन घेई नीरांजन कर,
तेज शिखेचें विद्युत पैंजण
दिशीदिशींच्या पदीं बांधुनी
शिवसुंदरिला कर आवाहन
जयघोषीं कर शत आवर्तन
ध्वस्त पसरला अंधकार जर
विकटाभासें पुण्यमंदिरीं,
स्वस्ति समर्पित तया करूनि दे
अर्घ्य प्रदानीं उर जळणारा—
व्यथाव्यथांच्या मौक्तिक हारा
मंदशेंदरी तुझ्या प्रभेने निजरूप देखें,
दिसें तुझेंही उज्ज्वल अर्चन !
उच्छ्वासांनी ज्योत फुंकुनी
झाडुन टाकिल भेकड पापें,
रामपदाचा स्पर्श पावुनी
शिळा जांभळी उठे अहिल्या,
शाप हलाहल शेष नुरे मग,
राहिल केवळ निर्मळ ज्योति
कोदण्डाचा टणत्कार श्रव,
सज्ज धनंजय पाशुपतासह,
शरशय्येहुन भीष्मपितामह
आशिर्वच दे धर्मराजया,
जागृत होई बाळा चिलया—
तुझि अस्मिता विशाल राहो—
चिरंजीव हो—
तूं विश्वंभर,
मी गंगाधर
देतों तुज वर ! ४

—श्री

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'पिचलेल्या पाण्या'पासून 'सुवास आणि रसा'पर्यंत

प्रा. सुरेश डोळके

(मागील अंकावरून पुढे)

'रसिका'स या पहिल्याच कवितेंत

रसें रसरसे हा पेरापेरांत
आहे आता अगदी ऐन भरांत ! (पृ. १)

अशी स्वतःच्या परिणतप्रतिभेची पंडित स्वतःच कबुली देतात, तर 'रसिकास' याच शेवटल्याहि कवितेंत--

'रसिका ! तुला रस तो हवा ?--
नि सुवासही ?- पण तो 'हवा' !
सुकलीं फुलें, पिकलीं फळें
रस लूट खूप नवा नवा !! (पृ. ११६)

अशी रसिकांना विनंति करितात. सुवास आणि रसांत पंडितांची भूमिका ही परिणतप्रज्ञ आणि तत्त्वचिंतक अशा आजोबांच्या वृत्तीकडे झुकत आहे. 'उन्मेष आणि उद्रेकां'त पंडितांच्या प्रतिभेच्या चंद्रकलेने अष्टमीपर्यंतचा प्रवास केला होता; 'उन्मेष आणि उद्रेकां'त तिने पौर्णिमेचें स्वरूप धारण केलें आहे. त्यांत वसंताचा उन्मत्तपणा नसून शरदाची स्निग्धता आहे.

त्यांतल्या 'प्रणयोन्मादां'त (पृ. ३६) विकाराची भावना नाही, विकासाची कल्पना आहे. 'मला माझ्या काव्यांत पहा. फुलांतून सुवास जसा वेगळा करतां येत नाही, तसा मीहि माझ्या काव्यापासून भिन्न नाही, असें पंडितांनी सांगितलें आहे. (पृ. ८०) 'फलभाराने लवलेल्या वृक्षाला कैच्यांचा आधार देणाऱ्या अनुभवी मालाकाराप्रमाणे (पृ. ६३) पंडितांची या संग्रहांतली वृत्ति आहे.

दुसऱ्या महायुद्धामुळे मानवी परंपरागत जीवनमूल्यांवरली श्रद्धा उडाली. समाजवादाकडे तो अधिकाधिक आकर्षित होऊं लागला. समाजवाद हें जगाला ग्रासणाऱ्या विषमतेच्या रोगावरचें एक प्रभावी औषध आहे हें त्याला अधिकाधिक पटूं लागलें. समाजवादाचा पुरस्कार हा नवकाव्यांतला एक महत्त्वाचा अंतःप्रवाह आहे.

'श्रमजीवी चाकांनो' (पृ. ३४) 'श्रमजीवी मधमाशांचा गुंजारव' (पृ. ५२), 'डिचवलेला वाघ' (पृ. ६६) इत्यादि कवितांत श्रमजीवि वर्गाच्या स्वत्वाची जाणीव प्रतिबिंबित झाली आहे.

द्युतिवलयीं अंगारक
उजळतील तव श्रीमुख,
भालि धर्मकण मौक्तिक
गुंफतील रुचिर हार (पृ. ५६)

असें 'श्रमसौंदर्य' त्यांना कळायला लागलें आहे. 'दोन कणसें' (पृ. ८१) आणि 'खालचा थर' (पृ. ८४) या कविता पंडितांच्या समाजवादी विचारसरणीची कल्पना आणून देण्यास पुरेशा आहेत.

इतर नवकवींप्रमाणे पंडितांची मानव्याच्या चांगल्यावरली श्रद्धा ढळली नाही. शारीरिक सुखासाठी सैतानाला आत्मा विकणाऱ्या गटेच्या 'फाउस्ट' मधील नायक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत हरघडी आढळत असतांनाहि जीवन हें देवालय आहे, क्रांति ही त्यांतली देवता आहे आणि त्याग हा त्या देवतेला दाखवायचा नैवेद्य आहे (उ. आणि उ. ५८, दान, रस आणि सुवास पृ. ९६) असें पंडितांना वाटतें. त्यामुळे त्यांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यांतून विफलतेचे निराशावादी चीत्कार ऐकूं येत नसून मानवतेचे व विश्वकुटुंबवादाचे आशावादी सूर ऐकूं येतात. 'विश्वचि अवघें हें माझें घर' (पृ. २६), 'वर्णविद्वेष' (पृ. ८९), 'सीमोल्लंघन कोठलें ?' (पृ. १००, २६, १, ५०, पृ. ७८) इत्यादि कवितांतून त्यांच्या विश्वकुटुंबवादाची कल्पना येईल. 'छाया' (पृ. ४५), 'देवदानवांतला दुवा' (पृ. ५९), 'अमर महात्मा' (पृ. ७०) इत्यादिकांत त्यांची मानवतेवरली श्रद्धा व्यक्त झालेली दिसेल.

'पानांचे तळहात वाजवित
त्यास बाहिते या या !' (पृ. ४५)

ही 'छाया' या कवितेंत व्यक्त झालेली कल्पना किती सुंदर आहे !

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यापासून मराठी कवितेंतहि नवप्रवाह सुरू झाला आहे. 'इंद्रप्रस्थाकडे' (पृ. ४२), 'स्वतंत्र भारत' (पृ. ७४) इत्यादि कवितांत स्वातंत्र्याच्या अरुणोदयाची प्रभा दिसते. 'भाऊबंदकी' (पृ. ५१), 'भाऊभाऊ' (पृ. ३७) इत्यादिकांत हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्या भावी ऐक्याचा आशावाद दिसतो. 'राष्ट्रध्वजास' (पृ. ४८), ध्वजवंदन (पृ. ७९) इत्यादिकांत राष्ट्रध्वजाचा जयजयकार आढळून येतो तर 'देवदानवांतला दुवा' (पृ. ५९) आणि 'अमर महात्मा' (पृ. ७०) यांत महात्मा गांधींचीं स्तुतिस्तोत्रें गायिलेलीं दिसून येतात.

लंघुं ज्ञानोदधी
होउं तेजोनिधी,
अग्निदेवापरी अध्वरीं धगधगूं
घालुं या कर करीं
ऊर लावूं उरीं
आणि डोळेभरी शरद शंभर बघूं (पृ. १२)

हीं 'शतशरद्' मधली भावना किती आशावादाची आहे !

प्रस्तुत संग्रहाचें वाङ्मयीन मूल्यहि मोठें आहे. पतीच्या आगमनाची चुटपुट लागलेल्या स्त्रीच्या हुरहुरीचें हें नाजुक चित्रण पहा—

'राव डुले ना, पान हले ना
वाटेवरुनी नजर चळेना
मृदुल करतळीं
पातळ हनु-वळि
हृदयांत सारखी 'चुटपुट'ती'! (पृ. २२)

सुंदर शब्दचित्र रेखाटण्याचें पंडितांचें कौशल्य पाहायचें असेल तर 'तुझे डोळे' (पृ. ६५) आणि 'जगाचा नकाशा' (पृ. ९४) या कविता पाहाव्या. पदलालित्य आणि श्रवणसुभग शब्दयोजना हा 'पिचलेल्या पाव्यां'-तील पंडितांच्या कवितांचा विशेष याहि संग्रहांतील प्रत्येक कवितेंत आढळतो.

दिसतांच कुणी गवळीण पथीं
करितो शिरिंची चरवी उलथी
चटकावि दही
मटकावि मही
मधु गोरस पोट भरून पिई
पळतो न तिथे मग तो पळतो
नट चंचल तो ! नटचंचल तो! (पृ. ४७)

या 'श्यामकिशोर' मधल्या ओळी पहाव्या. पदलालित्य आणि नादमाधुर्य या दृष्टीने पंडितांची ही कविता प्रस्तुत संग्रहांत सर्वोत्कृष्ट ठरेल. 'भाग्यपरीक्षा' (पृ.६७) आणि 'प्रीति आणि प्रौढी' (९०) या दोन कथाकाव्यांवरून पंडितांच्या रम्य कथनशैलीची कल्पना येईल. 'पिचलेल्या पाव्यां'त पंडितांची भूमिका भावनात्मकतेची होती, 'उन्मेष आणि उद्रेकां'त ती वैचारिकतेकडे झुकूं लागली होती. आणि 'रस आणि उद्रेकां'त ती पूर्ण चिंतनशील बनली आहे. अर्थात् ही चिंतनशीलताहि भावनेंतूनच उद्भवलेली आहे हें लक्ष्यांत ठेवायला हवें. फळाचा उगम फुलांतूनच होतो ना ? कवीची वैचारिकताहि तशीच.

'कला आणि जीवन' हा वाद पंडितांना वावदूकपणाचा वाटतो, केवळ कलेचीच उपासना करण्यांत धुंद असलेल्या मयासुराला उद्देशून ते म्हणतात—

मानतात 'मानव' अशी कला आसुरी
उरिं घालुनि घेतिल का ते सोन्याची सुंदर सुरी ?
(पृ. ५०)

(पुढील मजकूर पान २० वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समालोचन

झिमझिम

[काव्यसंग्रह; कवि व प्रकाशक द. चिं. सोमण सिव्हिल लाइन्स, वाशीम; पृष्ठें ६४; किंमत १२ आणे]

श्री. द. चिं. सोमण यांची कविता मराठी रसिकांच्या परिचयाची आहे. 'भावना' हा त्यांचा संग्रह १९३८ साली प्रसिद्ध झाला. त्यापूर्वींपासूनच त्यांच्या कविता अनेक नामवंत मासिकांमधून वेळोवेळीं प्रकाशित होत आल्या आहेत. अंतर्मुखता, तत्त्वचिंतन, नाजुक भावाविष्कार हे श्री. सोमण यांच्या कवितेचे ठळक पैलू आहेत. झिमझिम या त्यांच्या संग्रहांत १९४६ ते १९५३ पर्यंतच्या त्यांच्या निवडक कविता संग्रहीत केल्या आहेत.

प्रस्तुत संग्रहांत तीन चार ठळक प्रवृत्ति आढळून येतात. तत्त्वचिंतन हा सोमणांच्या काव्याचा स्थायी भाव म्हणतां येईल. कधी कधी हें तत्त्वचिंतन अंतर्मुख असतें, प्रतीतींतून स्फुरलेलें असतें. तेव्हा कवीच्या शब्दकलेमध्ये त्या जाणिवेच्या क्षणाचा प्रकाश साठवून घेण्याइतकी तरलता येते; प्रतीकांत आशय भरला जातो. अशा चांगल्या कवितांमध्ये कवीच्या बहुतेक सर्व आत्मीय गुणांचा समन्वय होतो., त्यांत गूढवादी, आध्यात्मिक प्रवृत्तींचा आविष्कार होतो; त्यांत निसर्गाचें रम्य व जाणीवपूर्ण चित्रण येऊन त्याचा भावदर्शनासाठी उपयोग केला जातो; प्रेमगीतांतील भावनेची कोवळीक येते. 'हेंच तुझें रूप' 'साक्षात्कार' 'वरें होतें द्वैत' या कविता अशापैकी आहेत. इतर कवितांत वरील प्रवृत्ति अलगपणें दिसतात. एकादी, केवळ बुद्धिनिष्ठ, तात्त्विक कल्पना मिरवते, तर एकादी निसर्गदृश्यावर कल्पकतेचा साज चढवूं पहाते. अशा कवितेने रसिकाचें समाधान होणें कठीण पण लागलीच 'कातरवेळीं' सारखी एखादी संथ, प्रतिमापूर्ण कविता खोल भावाविष्कार करते. सोमणांच्या अशा भावकवितेंत जसा जाणिवेचा सहज आविष्कार आढळतो, तशीच एक प्रकारची विश्लेषण वृत्तीहि आढळते, हें नमूद करण्यासारखें आहे. त्यांची आत्मलक्षी भावना, आपल्या मनाचे कोपरे जगूं संथपणें न्याहाळीत असते; एकेक भावकण निवांतपणें तपाशीत, अनुभवीत असते. या प्रवृत्तीमुळे त्यांच्या कवितेभोवती एकप्रकारचें शांत, आत्मस्थपणाचें वातावरण जाणवतें. येथे भावनांची भरारी सापडणार नाही, कल्पनेचीहि अचाट झेप नाही. सामाजिक दुःखदैन्याविषयी उद्वेग नाही, नव्या जगाची ओढ नाही. पण आपल्याच अंतर्यामांतील घटनांचे प्रामाणिक निरीक्षण, आस्वाद, पारख मात्र आहे. अभिव्यक्तीची ही पद्धत व तिला साजेसा स्वर जेथे टिकवला जातो त्या 'स्वगत'प्राय कविता मनाची एकदम पकड घेतात. जेथे ही वृत्ति कायम राहत नाही, त्या सोमणांच्या कविता रसाला जवळजवळ मुकतात. अंतर्मुख आत्मविश्लेषण ही सोमणांच्या काव्याची मुख्य शक्ति आहे. ती कधी प्रतीकात्मक तत्त्वचिंतनाचा आश्रय घेते, कधी सरळ, साध्या भावचित्रणाचा. या दोन्ही स्वरूपांतील ऋजुता जेव्हा कायम राहते, तेव्हा त्यांची कविता आकर्षक व पुनः पुनः वाचनीय वाटते.

—कु. वे.

सारेच सज्जन

[तीन अंकी सामाजिक नाटक; ले. : व्यंकटेश वकील; स्वस्तिक प्रकाशन, मुंबई; पृष्ठसंख्या ८७; किंमत दीड रुपया.]

अगदी अलीकडे, विशेषतः युद्धोत्तरकालापासून मराठी साहित्याला एक नवें वळण लागलें असून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नवकथा, नवकाव्य व नवी कादंबरी यांचा एक वेगळाच बहर मराठी साहित्याला आला आहे. साहित्याच्या ह्या अंगाबरोबरच नव-नाटयाचाहि अंकुर फुटला; परंतु तेवढ्या प्रमाणांत व तेवढ्या वैशिष्टय-पूर्णतेने नव्हे. नवकथा, विशेषतः कादंबरी ही अधिकाधिक देशी व स्थानीय वातावरणांतून कस व सामर्थ्य मिळवीत आहे. परंतु नवीन मराठी नाटकाने मात्र अजून देशी वातावरणांत पाळेंमुळें धरलीं नाहीत. त्याची प्रेरणा अजून परकीय आहे. किंबहुना मागच्या चार पांच वर्षांत जवळजवळ डझनभर नांव घेण्यासारखीं नाटकें लिहिलीं गेलीं व रंगभूमीवर आलीं, त्यांपैकी अधिकाधिक नाटकें रूपांतरित किंवा 'परकीय कल्पनेवरून' जन्माला आलेलीं आहेत. एवढेंच नव्हे तर, आजकाल रूपांतरित नाटकांनाच अधिक भाव आहे.

"अहो, स्वतंत्र नाटक देण्यापेक्षा, एखादे रूपांतरित नाटक कां देत नाही...निदान नुसतं 'परकीय कल्पनेवरून' ऐवढं असलं तरी नाटकाला वजन येतं" असें प्रकाशक व निर्माते चक्क सांगतात. श्री. व्यंकटेश वकील यांना ह्या गोष्टीची जाणीव झाली की काय नकळे. कारण "सारेच सज्जन" हें त्यांचें चौथें नाटक त्यांच्या पहिल्या तीन नाटकांप्रमाणे स्वतंत्र नाही. प्रस्तुत नाटक सुप्रसिद्ध आंग्ल नाटककार जे. बी. प्रीस्टले यांच्या 'An Inspector Calls' या नाटकाचा स्वैर अनुवाद आहे.

An Inspector Calls हें जे बी. प्रीस्टलेच्या नाटकांपैकीं अतिशय सुंदर व नांवाजलेलें नाटक आहे. १९४६ सालीं old vic कंपनीने तें रंगभूमीवर आणलें. त्यापूर्वी प्रथम रशियांत व नंतर युरोपांत या नाटकाचे अनेक यशस्वी प्रयोग झाले.

"In no other play have Priestley's gifts more billiantly Combined"... "An Inspector calls reminds us that he may always have a masterpiece up his sleeve" अशा रीतीने 'मास्टर पीस' म्हणून गाजलेल्या या नाटकाची कथावस्तु अभिजात, मौलिक आहे. तंत्रपद्धतीहि अभिनव आहे. प्रीस्टलेच्या प्रतिभेला नेहमीच प्रयोगशीलतेची आवड आहे. या नाटकांतहि त्याने एका नवीन तंत्राचा अवलंब केला आहे. श्री. वकील यांचा अनुवाद स्वैर आहे...परंतु कथावस्तु व तंत्र ही दोन्ही तशींच ठेवलीं आहेत. त्यामुळे मराठी रूपांतरांतहि मूळ नाटकाची अभिनवता उतरली आहे. रेशमा जगदाळे या एका कामगार स्त्रीच्या आत्महत्येला एकाच श्रीमंत कुटुंबांतले पांचहि जण—शिष्ट धनिक अण्णासाहेब, घमेंडखोर आईसाहेब, त्यांचा खुशालचेंडू मुलगा चंदू, स्वतःच्या चेहरेपट्टी-बद्दल अहंकार असलेली मुलगी शीला व गुलहौशी भावी जामात बाबूराव—हे वेगवेगळ्या रीतीने कारणी-भूत होतात याची त्यांना जाणीवहि नसते. परंतु शैलाचा वाढदिवस व साखरपुडा साजरा करण्यांत तें कुटुंब दंग असतांना अचानक एक गूढ पोलिस इन्स्पेक्टर रेशमाच्या आत्महत्येची चौकशी करायला येतो. हळूहळू एकेक करून तो पांचहि जणाकडून प्रत्येकाने आपापल्या आयुष्यांत पडद्याआड दडवून ठेवलेल्या दुष्कृत्याचा व पर्यायाने रेशमाच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याचा कबुलीजबाब घेतो. जातांना "तुम्हीं स्वतःला एकटे समजूं नका...वेगळे समजूं नका...एकाच समाजाचे आपण सर्व घटक आहोंत, सर्वांच्या सुखदुःखाची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे"...अशी नवी जाणीव करून देऊन निघून गेल्यावर मागाहून साऱ्यांच्या लक्षांत येतें की इन्स्पेक्टर शेलारने आपल्या तपासणींत प्रत्येकाकडून केवळ तोंडी कबुली जबाब घेण्यापलीकडे व प्रत्येकाची कानउघाडणी करण्यापली-कडे कायद्याला आवश्यक असें कांहीच केलें नाही. शिवाय, त्यांनी केलेल्या दुष्कृत्याचा परिणाम एकाच स्त्रीवर कशावरून झाला, अशी शंका त्यांच्या मनांत येते व एकंदर सर्वच बाबतींत शेलार तोतया असल्याची खात्री पटते. लगेच बाबूराव पोलीस चौकीवर फोन करून विचारतात तेव्हा शेलार नांवाचा एकहि पोलिस इन्स्पेक्टर सरकारी नोकरींत नसल्याचें व प्रेतखान्यांत एकहि मुलगी आत्महत्येने मेली नसल्याचे त्यांना समजतें. त्याबरोबर सर्वांचा टांगलेला पाय भांड्यांत पडतो. आता आत्महत्येच्या प्रकरणांत गुंतल्यामुळे होणारी बेअब्रूची भीतीहि नाहीशी होते व इन्स्पेक्टर शेलारसमोर प्रत्येकाने क्षणभर बाजूला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काढून ठेवलेले सज्जनतेचे मुखवटे प्रत्येकजण पुन्हा चढवतो...पुन्हा कांहीच झालें नाही अशी समजूत करून घेऊन "खरेच सज्जन" बनतात. परंतु याला दोन अपवाद आहेत.

संपत्तीच्या नशेने पुरेशीं निर्ढावलेलीं मनें नसलेले, व मानवतेची धुगधुगी अजून हृदयांत शिल्लक असलेले नव्या पिढीचे प्रतिनिधि शैला व चंदू, यांच्या हृदयाला मात्र झालेला प्रकार स्पर्श करून जातो. शेलार तोतया असो वा नसो, ज्या गोष्टी घडल्याचें आपण कबूल केलें, त्या खरोखरीच घडल्या आहेत. "ज्या पद्धतीने आपण आजपर्यंत जगत आलों, नांदत आलों, ती चुकीची आहे. मनाला एक नवं वळण लावायला हवं" याची त्यांना तीव्रतेने जाणीव होते. तेवढ्यांत टेलीफोनची घंटा पुन्हा खणखणते व एका तरुणीनं आत्महत्या केली असून एक पोलिस इन्स्पेक्टर चौकशीसाठी येत असल्याचें सर्वांना कळतें...नाटकाच्या शेवटीं खराखुरा इन्स्पेक्टर येत असल्याचा प्रसंग घालून, वातावरणाला एक नवीन तुरपण घालण्यांत प्रीस्टलेचें अतीव कौशल्य दिसून येतें. प्रीस्टलेच्या वैशिष्ट्यपूर्णतेची त्यावर पुरेपूर छाप आहे.

हें नाटक तांत्रिक दृष्ट्या श्रेष्ठ दर्जाचें आहे; सामाजिक नीतिमत्तेच्या दृष्टीने या नाटकाचें मूल्य फार मोठें आहे. प्रीस्टले हा समाजनिष्ठ आहे. त्याच्या कलेला सामाजिक नीतिमत्तेचें अधिष्ठान आहे. आज रंगभूमीच्या कलात्मक सौंदर्याबरोबरच, तिच्या सामाजिक सामर्थ्यावरहि त्याची अढळ श्रद्धा आहे. गूढ इन्स्पेक्टर शेलार हा दुसरा तिसरा कोणी नसून त्याच्या रूपाने लेखकाने सामाजिक सदसद्विवेक बुद्धि उभी केली आहे.

सर्वांकडून कबुली जबाब घेतल्यानंतर जाण्यापूर्वी तो बजावतो "एक रेशमा जगदाळे मेली, पण आमच्यांत अजून हजारों रेशमा जगदाळे आहेत. त्यांचं जीवित त्यांचीं सुखदुःखं, त्यांचं अस्तित्व, त्यांच्या आशाआकांक्षा, तुमच्या जीवनांत...उभ्या आडव्या धाग्याप्रमाणे विणलेलीं आहेत. तुम्ही स्वतःला एकटे समजूं नका...एकमेकांच्या सुखदुःखाची जबाबदारी सर्वांवरच आहे. आणि लक्षांत ठेवा,...आपण जर आपापलं कर्तव्य विसरलों तर एक क्षण असा येईल की तो आपणा सर्वांनाच पेटलेल्या पलित्याच्या प्रकाशांत ...रक्ताच्या शाईनं एक नवा धडा शिकवील...नवी माणुसकी शिकायला भाग पाडील."

यांत क्रांतीचा इशारा आहे. सामाजिक सदसद्विवेक बुद्धीला आव्हान आहे. व "Every man is his brother's Keeper" 'प्रत्येक व्यक्तीनं दुसऱ्याच्या पोषणाची जबाबदारी संभाळली पाहिजे' हें बायबलमध्ये केनने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर आहे.

श्री. वकील यांचा, नाटकाचा अनुवाद चांगला आहे. मूळ नाटकांतील सर्व कौशल्य त्यांनी रूपांतरांत उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु नाटकाला देशी पेहराव चढवतांना क्वचित ठिकाणीं अस्वाभाविकतेचा दोष टाळतां आला नाही. उदा. रेशमा जगदाळे ही मूळच्या नाटकाची प्रतिकृति वाटत नाही...वाढूं शकत नाही...वाममार्ग व सामाजिक प्रतिष्ठा ह्या आपल्याइकडे उघडपणें दोन्ही बरोबर जाऊं शकत नाहीत...म्हणून रेशमा स्वाभाविक वाटत नाही...

सहापात्री सुमारें नव्वदपानी हें नाटक प्रयोगाच्या दृष्टीने बसवायला सुटसुटीत आहे, सोपें आहे. श्री. आत्माराम भेंडे यांनी मुंबईला या नाटकाचें यशस्वी प्रयोग करून दाखविलेच आहेत...संपूर्ण नाटक संवादप्रधान (Dialogue Play) असल्यामुळे प्रत्येक पात्राला वैशिष्ट्यपूर्णता व वागणुकीची लकब (Mannerism) दिल्यास नाटक कंटाळवाणें होणार नाही. कारण नाटकांत कृति नसली तरी गति विलक्षण आहे. नाटक बसवितांना मात्र अनुवादांत उतरलेला पण मूळ नाटकांत नसलेला एक छोटा दोष लक्षांत येतो. तोतया इन्स्पेक्टर निघून जातो हा नाटकाचा उच्चबिंदु (Climax) आहे. त्यानंतर नाटक जास्त लांबवायचें anticlimax चा दोष पत्करून, म्हणजे शेलार गेल्यानंतर नाटकाच्या शेवटीं खराखुरा इन्स्पेक्टर येईपर्यंत पुस्तकाचीं १८ पानें खर्ची घातलीं आहेत. हा भाग अधिक संक्षिप्त करतां आला असता. मूळ नाटकांत हा दोष नाही. एवढा दोष वगळल्यास, नाटक सुंदर बठलें आहे. परिणामकारक आहे. आजच्या यंत्रशक्तिनिर्मित समाजा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुढे मानवता जिवंत कशी ठेवावी हा एक यक्षप्रश्न आहे. दिवसेंदिवस आपल्या सामाजिक नीतिमत्तेची पातळी खाली घसरत आहे. अशा काळांत "सारेच सज्जन" सारख्या योग्य कलाकृतीची निवड करून मराठी रंगभूमीला सादर केल्याबद्दल श्री. व्यंकटेश वकील हे अभिनंदनास पात्र आहेत.

इंदुमती शेवडे

पदन्यास

[प्रकाशक : रा. मो. करकरे, अध्यक्ष, शारदोपासक मंडळ, ग्वाल्हेर. संपादक : अ. म. जोशी, एम्. ए., ना. वा. गोडबोले, एम्. ए. व कु. चंपावती केतकर, एम्. ए. पृष्ठें १६४ ; किंमत २॥ रु.

महाराष्ट्रापासून दूर असलेल्या प्रदेशांत मराठी वाङ्मयाची सेवा करण्याचा स्तुत्य प्रयत्न ग्वाल्हेरच्या शारदोपासक मंडळाने चालविलेला आहे. शारदोपासक मंडळाच्या एतद्विषयक कार्याचा परिचय कु. चम्पावती केतकरांनी आपल्या प्रास्ताविकांत करून दिलेला असून मंडळाच्या शारदा-प्रकाशनातर्फे प्रतिवर्षी एक तरी पुस्तक प्रकाशित करायचेंच असा मंडळाचा प्रतिज्ञा-लेख मराठी-साहित्यभक्तांना खरोखरीच उत्साहित करील यांत संदेह वाटत नाही. केवळ साहित्य-चर्चात्मक पुस्तकांचेंच प्रकाशन घेतलें तरी मंडळाने मराठी वाङ्मयांत चांगलीच मोलाची भर टाकल्याचें दिसून येईल. 'पदन्यास' पूर्वीचीं त्यांचीं दोन प्रकाशनें— 'नाट्यचर्चा' आणि 'राजकवि तांबे पत्रव्यवहार'— या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहेत. विशेषतः राजकवि तांबे यांनी निरनिराळ्या प्रथितयश आणि नवोदित लेखकांना इंग्रजी-मराठी भाषेंतून साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा करणारीं जीं पत्रें पाठविलीं त्या पत्रांच्या अध्ययनाने साहित्याच्या अंगोपांगांचें सम्यक् ज्ञान वाचकाला होतें. विशेषतः स्वतः तांब्यांनीच आपल्या काव्याबाबत त्या पत्रांतून जें स्पष्टीकरण व विवेचन केलें आहे त्यामुळे त्यांच्या काव्याचें मूल्यमापन करून त्यांचें रसग्रहण करतांना साहजिकच नवा आनंद प्राप्त होऊं शकतो. 'पदन्यास हा संग्रहहि अशाच प्रकारें साहित्याच्या अभ्यासकांस उपयुक्त वाटेल. माझ्या माहितीप्रमाणे तरी मराठींत केवळ 'एकांकिका'चा प्रातिनिधिक संग्रह प्रसिद्ध झालेला नाही. तसें पाहिलें तर साहित्याच्या या अंगाकडे लेखकांचें बरेंच दुर्लक्ष झालें आहे. प्रा. फडके, प्रा. गंगाधर गाडगीळ, श्री. रांगणेकर आदि प्रथितयश लेखकांनी एकांकिकांचें लेखन केलें आहे खरें, परंतु 'एकांकिके'चें विशिष्ट तंत्र वाचकांच्या वा प्रेक्षकांच्या ध्यानांत येण्याइतक्या विपुलतेने त्या लिहिल्या गेल्या नाहीत. या दृष्टीने प्रस्तुत संग्रह उपयोगी ठरतो. शिवाय विभिन्न प्रवृत्तींच्या अनेक लेखकांनी ह्या एकांकिका लिहिल्या असल्यामुळे विषयवैचित्र्याबरोबरच एकांकिकेच्या स्वरूपाचेंहि स्पष्ट दिग्दर्शन त्यांत केलेलें आढळतें.

एकांकिका हा नाटकाचाच प्रकार असला तरी कादंबरी व लघुकथा यांत जो भेद तोच भेद जवळ-जवळ त्या उभयतांत आहे. ह्या दृष्टीने नाटकाचें व एकांकिकेचें तंत्र हेंहि वेगळें असतें. त्यामुळे प्रस्तुत संग्रहाला जोडलेल्या प्रस्तावनेंत एकांकिकेच्या तंत्राचें विवेचन अपेक्षितच होतें. मात्र स्थानमर्यादेमुळे कु. केतकरांना तें विवेचन सविस्तर करतां आलें नाही. प्रस्तुत परीक्षण हें केवळ ग्रंथपरिचयाच्या स्वरूपाचें असल्यामुळे व स्थानसंकोचामुळे मलाहि इच्छा असून तंत्रविषयक विवेचनाचा मोह बाजूला सारावा लागत आहे. जिज्ञासूंनी 'एकांकिका' संबंधीचा प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचा लेख पहावा.

ह्या संग्रहांतील तीन अनुवादित रूपांतरित एकांकिका सोडल्यास इतर सर्व एकांकिका—लेखकांची स्वयंनिर्मिति आहे. अनुवादांपैकी मॅक्झिम गॉर्की या रशियन साहित्याचार्याच्या एकांकिकेचें सौ. शांताबाई वाकणकर यांनी केलेलें 'परिस्थितीप्रमाणे परिवर्तन' हें रूपांतर उत्कृष्ट साधलें आहे. एकांकिका यशस्वी होण्यास आवश्यक त्या सर्व गुणांचा आढळ येथे होतो. त्याचप्रमाणे श्री. उमाशंकर जोशी या गुर्जर लेखकांची 'दाराबर थाप' ही श्री. अ. म. जोशी यांनी अनुवादित केलेली, व डॉ. रामकुमार वर्मा ह्यांची 'चारुमित्रा' ही श्री. गो. दातार ह्यांनी अनुवादित केलेली एकांकिका, ह्या प्रस्तुत संग्रहाचें मोल वाढविण्यास समर्थ आहेत. वरील गुर्जर व हिंदी लेखक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपापल्या भाषेंतील मातबर लेखक असल्याने परप्रांतीय साहित्यांतील एकांकिकांची योग्यता कांही प्रमाणांत ह्या एकांकिका स्पष्ट करूं शकतील. स्वतंत्र एकांकिकांत मात्र मला सर्वांत अधिक आवडणारी एकांकिका श्री. चंद्रकांत ओदक ह्यांनी लिहिलेली 'आम्हाला जगायचं आहे!' ही एकांकिका होय. पोलिस पाटलाच्या 'ग्रामव्यवस्थे'वर प्रकाश टाकणारी 'थोरले साहेब' ही श्री. राम जोगळेकर यांनी लिहिलेली एकांकिका आणि गोगोलचें श्री. पु. ल. देशपांडेकृत अमलदार हें रूपांतरित नाटक ह्यांत मात्र विलक्षण साम्य आढळतें! 'अहो आपण एका जातीचे!', 'एकच स्फोट', 'तृषा', 'ध्येयनिष्ठा', ह्या एकांकिकाहि वाचनीय आहेत. मात्र अगदी सुरवातीची 'शरणार्थी' ही एकांकिका मनाची पकड घेऊं शकत नाही इतकी अस्वाभाविक वाटते. वास्तविक अशा एकांकिकांची सरसनिरसता त्या वाचायला कशा वाटतात ह्यावर अवलंबून असण्यापेक्षा रंगमंचावरील त्याच्या दृश्य आविष्कारावरच विशेषतः अवलंबून असते. प्रस्तुत संग्रहांतील एकांकिका मंचावरहि यशस्वी होतील असें म्हणावयास हरकत वाटत नाही. साहित्य आणि नाट्य ह्यांचा सुंदर समन्वय असलेल्या एकांकिकांचा हा संग्रह मराठी वाचकांच्या पदरांत टाकल्याबद्दल संपादक-प्रकाशकांचें अभिनंदन. परप्रांतांत मराठी साहित्याची ज्योत त्यांनी तशीच तेवत ठेवावी ही अपेक्षा व्यक्त करून हा परिचयलेख आटोपता घेतों.

—वसंत वऱ्हाडपांडे

माहेरवाशीण

(लेखक : गो. रा. दोडके; प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, किं. १ रुपया)

इतर कुठल्याहि वाङ्मयप्रकारापेक्षा लघुनिबंध वा गुजगोष्ट या वाङ्मयप्रकारांत लेखकाचें व्यक्तिमत्व ठळकपणाने नजरेस येतें. त्या त्या लघुनिबंधांत प्रकट होणारा लेखक हा 'व्यक्ति' या नात्याने जर तुम्हाला आवडला, तर त्याचे लघुनिबंध आवडले हें ओघानेच येतें. लेखक हा कितीहि चतुर कलावंत असला, तरी लघुनिबंधासारख्या वाङ्मयप्रकारांतून त्याला आपला 'स्वभाव' लपवितां येत नाही आणि तो 'स्वभाव' जर वाचकास पटला नाही, तर इतर कलाकुसर व्यर्थ जाण्याचा संभव असतो. आणि म्हणूनच कांही विशिष्ट लघुनिबंधलेखकांचा चाहता वर्ग विशिष्ट असतो. व विशिष्ट वाचकवर्गाला विशिष्ट लघुनिबंधकार आवडतात.

'माहेरवाशीण' या संग्रहांत प्रकट झालेले गोविंदराव दोडके मला आवडले. खाजगी मैत्री ही वाङ्मयीन मूल्यांत बसली नसली तरी तीमुळे लेखकाच्या ज्ञात स्वभावाचें कितपत प्रामाणिक असें प्रत्यंतर त्याच्या वाङ्मयांत उमटलें आहे हा पडताळा घेतां येतो. या दुहेरी हिशोबांत ही आमची मैत्री वाढली, हें विशेष होय.

टॉलस्टॉय, चेकाव्ह, अँड्रिव्ह, गॉर्की यांना मांजरीच्या सेवेंत रात्रदिवसांत मानसिक समाधान मानणारा साहित्यिक, आयुष्यांतील उत्कट अनुभवप्रसंगीं तो आशय व्यक्त करणारी श्रेष्ठ कवीची श्रेष्ठ कविता आपलीशी करून तिच्या खाली आपलें नांव तारीख व खेळ घालणारा व अशा कवितांच्या संग्रहाला आपला संग्रह मानणारा अ-सामान्य कवि, कितीक टांगलेले जुने फोटो, कपाटांत ठेवलेलीं पुस्तकें, सुहृज्जनांचीं पत्रें, संबंधी माणसांकडून वेळोवेळीं आलेल्या चिठ्याचपाट्या, ठेव म्हणून जिवाभावाच्या प्रेमळांनी सादर केलेल्या वस्तु जीवापलीकडे जतन करून क्वचित् कधी त्यांच्या आठवणींत गेलेला आनंद पुन्हा ताजेपणाने उपभोगण्याची भावुक वृत्ति, सार्वजनिक ग्रंथसंग्रहालयांमधील पुस्तकांतील शेरे—अभिप्रायांतून आपल्या चिकित्सक टीपा, दृष्टीच्या पडताळा घेण्याची जगावेगळी उदार-बुद्धि, आयुष्यांतील भावनात्मक रूपाचें टिपण रोजनिशींत करून एकप्रकारें काळाला बांधून आपल्या जीवनाचे भावनात्मक अनुभव अक्षय करण्याचा प्रयत्न करणारी जीवनासक्त वृत्ति, आपल्या छोट्याशा विश्वांतील पलंगासारख्या क्षुल्लक वस्तुविषयीची आपली आत्मीयता कबूल करण्याचा प्रामाणिकपणा, ग्रंथसंग्रहाच्या निवडींतील सौंदर्यशोधक दृष्टि असे गोविंदराव दोडक्यांच्या स्वभावाचे नानाविध पैलू आपणाला या संग्रहांतून प्रत्ययास येतात; हा प्रकट होणारा माणूस हक्क आहे, मौला आहे, प्रेम करण्या-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

सारखा, मैत्री जोडण्यासारखा आहे. म्हणूनच हा संग्रह मला आवडला.

कांही निबंध त्यामानाने कमी रंजक आहेत याची मला कल्पना आहे. कॅलेंडर, घड्याळ, पुस्तकें, सापडलेला रुपया, भवितव्य, निदान नांव ठेवतांना तरी, हे निबंध अट्टहासी आहेत. त्यांत विषयांचें नाविन्य नाही, पण जे आवडले ते निबंध इतके सुंदर आहेत की इतरांतील हा दोष क्षम्य आहे.

मराठींतील लघुनिबंधकारांत श्री. गो. रा. दोडके यांचें नांव वरच्या श्रेणींत आहे. हा त्यांचा पहिलाच लघुनिबंधसंग्रह आहे. त्यांचें वाङ्मय समृद्ध आहे. त्यांच्या कथांचे व निबंधांचे संग्रह बाहेर पडायला हवेत. त्याविषयी लेखक बेफिकीर आहे; पण मराठी वाङ्मयसेवकांची जबाबदारी निराळी आहे. कागद व छापखान्यांच्या सोयीने जर त्यांच्यासारख्या जुन्या लेखकांचें वाङ्मय प्रसिद्ध व्हायला लागलें तर साहित्याच्या बाजारांत छापखान्याची व कागदाची सोय असल्याने भलताच माल वाङ्मय म्हणून साहित्याच्या बाजारांत येत राहील व खपूं लागेल.

खऱ्या वाङ्मयीन मूल्यांऐवजी असल्या आगंतुक मूल्यांनी साहित्यिक व साहित्य यांना मोल येण्याच्या आजच्या काळांत ही सावधगिरी घेणें अगत्याचें आहे.

—केशव केळकर

वि. सा. संघाच्या परीक्षांना मान्यता

राष्ट्रभाषा प्रचार समिति, वर्धा द्वारा संचालित 'राष्ट्र भाषा परिचय' या तिसऱ्या मध्यप्रदेश शासन द्वारा मान्य परीक्षेस विदर्भ साहित्य संघ द्वारा संचालित 'साहित्य स्नातक परीक्षा' उत्तीर्ण विद्यार्थी सरळ बसूं शकतात. त्यांना तत्पूर्वीच्या दोन परीक्षा गाळतां येतील. ही सवलत सप्टेंबर ५३पासून लागू होईल. यापूर्वी या प्रकारची मान्यता केवळ सरकारमान्य विद्यापीठाच्या उपाधिधाऱ्यांनाच होती. [जा. क्र. ४।३८३३ दि. ८-१-५४च्या पत्राधारें]　—माणिक के. बैतुले
कार्यवाह-परीक्षा समिति

'पिचलेल्या पाख्यां'पासून 'सुवास आणि रसा'पर्यंत

(पान १४ वरून)

तर केवळ जीवनवादी असलेल्या कवीला ते 'इसापनीतींतला कोंबडा' (पृ. ८७) मानतात. आणि शेवटीं म्हणतात—

कलेवेगळें रे ! जीवन जें—
तें नच रसमय
तें नच अक्षय ! (पृ. ८८)

'उन्मेष आणि उद्रेकां'त 'प्रेममंदिर' या नांवाचें एक सुनीत आहे.

ताजमहाल हें कवीला प्रियकर आणि प्रेयसी किंवा 'पति आणि पत्नी' यांच्या प्रेमाचें प्रतीक वाटतें. तो म्हणतो—

'बांधी ताजमहाल हा निज मृता कांतेवरी तो जरी
प्रेमाची अजरामर प्रकट ती प्राणप्रतिष्ठा तरीं !'

ताजमहालांत केवळ पतिपत्नीच्या वैषयिक प्रीतीचें प्रतीक पाहणारी 'उन्मेष आणि उद्रेकां'तली भावना 'सुवास आणि रसां'त विकसित होऊन म्हणते—

वा जी बीजच जीवसृष्टिस ! करी
जी तन्विकासोन्नती !
ती ही स्त्रीपुरुषांतली प्रगटली
साक्षात् मनोज्ञा रती ? (पृ. ७५)

पतिपत्नीच्या स्वयंकेंद्रित प्रणयाचें रूपांतर, जीवसृष्टीच्या मुळाशीं असलेल्या विशाल प्रेमभावनेंत झालें आहे. 'कुणाल कांचना' या पंडितांच्या अप्रकाशित कथाकाव्यांत किंवा 'गौतमबुद्ध' या त्यांच्या संकल्पित खंडकाव्यांत तिचें रूपांतर साऱ्या विश्वाच्या मुळाशीं असलेल्या आणि 'अवघें विश्वचि माझें घर' असें समजणाऱ्या विश्वकुटुंबवादी मानवतेंत झालेलें दिसेल अशी आशा केल्यास ती व्यर्थ होईल का ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

केंद्रवृत्त, नागपूर

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

विदर्भ साहित्य संघाचें १६ वें वार्षिक अधिवेशन

प्रदर्शनाच्या उद्‌घाटनानें शुभारंभ

विदर्भ साहित्य संघाचें १६ वें वार्षिक अधिवेशन महाराष्ट्राचे ख्यातनाम कवि प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली खामगाव येथे, न्यू ईरा हायस्कूलच्या प्रशस्त पटांगणांत उभारलेल्या एका विशाल मंडपांत, शुक्रवार दि. २५, शनिवार दि. २६ व रविवार दि. २७ डिसेंबर १९५३ रोजीं भव्य स्वरूपांत साजरें झालें. या अधिवेशनाच्या कार्यक्रमाचा शुभारंभ 'साहित्य आणि कला' यांच्या प्रेक्षणीय प्रदर्शनाच्या उद्‌घाटनानें झाला. प्रदर्शनाचें उद्‌घाटन मराठी व हिंदीचे नाणावलेले साहित्यिक श्री. प्रभाकरराव माचवे यांच्या हस्तें झालें. उद्‌घाटन करतांना ते आपल्या ओजस्वी भाषणांत म्हणाले, "ज्यांच्या बहुमोल साहित्यानें महाराष्ट्र सारस्वत समृद्ध झालें अशा थोर साहित्यिकांचें यथोचित स्मारक होणें आवश्यक आहे. मराठी भाषा सोडून अन्य भाषिक साहित्यिकांचीं स्मारकें झालेलीं आहेत व होत आहेत. परंतु आपल्या मराठी साहित्यिकांचें मात्र स्मारक कुठेच दिसत नाही. याच खामगावशीं कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा संबंध होता. पण त्यांचें सुयोग्य स्मारक मात्र अद्याप होऊं शकलें नाही. अशा बाबतींत सरकारनें पुढाकार घेणें उत्तमच. परंतु सर्वच गोष्टी सरकारनें करण्यापेक्षा लोकांनी स्वयंस्फूर्तीनें केल्यास अधिक उचित होईल. तसेंच आपल्या मराठी साहित्याचा परिचय अन्य भाषियांना व विशेषतः परदेशीयांना करून देणें अनेक दृष्टींनी आवश्यक आहे. नव्हे, त्याची आजच्या काळांत विशेष गरज आहे. विचारांची देवाणघेवाण होणें पारस्परिक दृष्टिकोन समजावून घेण्याच्या दृष्टीनें फार आवश्यक असतें."

प्रदर्शनाचें वैशिष्ट्य

प्रदर्शनांत ठळकपणे चार गोष्टी नजरेंत भरत होत्या. प्रथमदर्शनीं प्रख्यात साहित्यकार कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें तैलचित्र आणि ते वापरीत असलेला दौतादि साहित्य. दुसरें म्हणजे खामगावच्या परिसरांतील दिवंगत व हयात असलेल्या साहित्यिकांच्या विविध कलाकृति. तसेंच पंचे गुरुजींच्या टिळक राष्ट्रीय विद्यालयांतील मनोवेधक शिल्पकला व चित्रकला. तिसरें, मध्यप्रदेश संशोधन मंडळातर्फे श्री. दे. गो. लांडगे यांनी परिश्रमपूर्वक सजविलेला पुराणवस्तु संग्रह व संशोधनात्मक लेख. आणि चौथें; मध्यप्रदेश सरकारच्या समाजसेवा संचालनालयातर्फे श्री. ना. ह. कुळकर्णी, श्री. रा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

य. रुद्राक्ष व श्री. मदारीया यांनी सरकारी प्रकाशनांची कुशलतेने केलेली मांडणी. याशिवाय कलात्मक असें भरतकाम, विणकाम, नक्षीकाम व इतर चेतोहारि हस्तकौशल्याचे नमुने.

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा शुक्रवार दिनांक २५-१२-५३ रोजीं खामगाव मुक्कामीं संघाध्यक्षांच्या निवासस्थानीं सकाळीं ९-३० वाजतां प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली भरली. त्यावेळीं खालीलप्रमाणे महत्त्वाचें कामकाज झालें.

१. सरचिटणिसांनी दि. ४-१०-१९५३ रोजीं भरलेल्या का. का. मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

२. नंतर सरचिटणिसांनी १९५४-५५ सालच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीसंबंधीच्या तारखांचा तक्ता सभेला सादर केला व तो मंजूर झाला. घटनानियम २१ (ए) प्रमाणे निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या उमेदवारांनी उमेदवारी परत घेण्याची अध्यक्षांनी ठरविलेली ३० जानेवारी १९५४ ही तारीख मान्य करण्यांत आली.

३. गडकरी स्मृतिदिनानिमित्त १९५२ सालीं डॉ. मा. गो. देशमुख यांनी लिहिलेल्या 'वाग्वैजयंतीचें पूनर्मूल्यन' आणि १९५३ सालीं श्री. द. रा. गोमकाळे यांनी लिहिलेल्या 'नाटककार गडकरी' या निबंधांना प्रत्येकी ५० रु. मानद्रव्य देण्यास सभेने मंजुरी दिली.

४. युनेस्कोशीं सहकार्य करण्यासाठी स्थापन झालेल्या इंडियन नॅशनल कमिशनतर्फे दिल्ली येथे दि. ९ ते १४ जानेवारी १९५४ रोजीं भरणाऱ्या परिषदेस प्रतिनिधि पाठविण्यासंबंधीचें पत्रक सभेपुढे ठेवण्यांत आलें. उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांनी या पत्रकासंबंधी माहिती दिली व वि. सा. संघाचे प्रतिनिधि म्हणून श्री. आ. रा. देशपांडे यांचें नांव सूचित करण्यांत आलें आहे असें सांगितलें. त्यावर पुनः विचार होऊन, संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांना खर्च देऊन परिषदेस प्रतिनिधि म्हणून पाठवावें असें ठरलें.

५. संमेलनाच्या कार्यक्रम-पत्रिकेवर सर्व चिटणिसांच्या सह्या नसल्याच्या कारणावरून, वि. सा. संघाचे एक चिटणीस श्री. ना. ग. डबीर यांनी आपल्या चिटणीसपदाचा राजीनामा पाठविला. त्या पत्रावर विचार करण्यांत आला. सरचिटणिसांनी केलल्या खुलाशांतीं, श्री. ना. ग. डबीर यांना राजीनामा परत घेण्याबाबत विनंती करण्यांत यावी, असें ठरलें. पुढे मात्र संमेलनाच्या कार्यक्रम-पत्रिकेवर सरचिटणिसांबरोबर सर्व चिटणिसांचीं नांवें असावींत, असा निर्णय घेण्यांत आला.

६. नंतर सरचिटणिसांनी, राजभाषा अधिनियम उपसमितीचें निवेदन आणि तसेंच श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचें राजभाषा अधिनियम उपसमिति व मंदिरनिधि समितीच्या आमंत्रक पदांच्या राजीनाम्यांचें पत्र सभेला सादर केलें. त्यावर विचार होऊन, ग. त्र्यं. माडखोलकर यांना आपल्या दोन्ही समित्यांवरील पदांचे राजीनामे परत घेण्यासंबंधी विनंती करण्यांत यावी, असें ठरलें.

शेवटीं संमेलन व साधारण सभेकरिता आलेले ठराव सादर करण्यांत आल्यावर, सभेचें काम संपलें.

वि. सा. संघाची साधारण सभा

वि. सा. संघाची साधारण सभा खामगाव येथे शुक्रवार दि. २५-१२-५३ रोजीं सकाळीं १०-३० वा. संमेलनांतील सभेच्या दिवाणखान्यांत प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली भरली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१. प्रथम सरचिटणिसांनी दि. २६-४-१९५३ रोजीं भरलेल्या सर्वसाधारण वार्षिक सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो एकमताने मंजूर झाला.

२. नंतर १९५४-५५ सालच्या का. का. मंडळाच्या निवडणुकीसाठी लवाद नेमण्याचा प्रश्न सभेपुढे आला. डॉ. मा. गो. देशमुख यांनी श्री. ए. श्री. पटवर्धन यांचें नांव सुचविलें. प्रा. सुरेश डोळके यांनी त्यास अनुमोदन दिलें. श्री. म. बा. देवघरे यांनी श्री. प्रभाकरराव माचवे यांचें नांव सुचविलें. त्यास श्री. त्रि. गो. देशमुख यांनी अनुमोदन दिलें. श्री. प्रभाकरराव माचवे यांची अनुमति, सूचकाला वेळ देऊनहि त्यांचेकडून न आल्यामुळे, श्री. ए. श्री. पटवर्धन यांचें लवादासाठी एकच नांव उरलें. ते अविरोध निवडून आल्याचें अध्यक्षांनी जाहीर केलें.

३. कार्यकारी मंडळाने शिफारस केलेला परीक्षासमितीच्या ८५० रु. च्या जादा खर्चाच्या मंजुरीचा प्रश्न सभेपुढे आला. या प्रश्नावर साधकबाधक चर्चा होऊन ह्या रकमेला सभेने मंजुरी दिली.

४. त्यानंतर श्री. के. दे. देशपांडे यांनी सुचविलेला व श्री. व. शि. चुके यांनी अनुमोदन दिलेला, वि. सा. संघाच्या निवडणुकीसाठी पुरस्कार व प्रचार न करणें, तसेंच निवडणूक उमेदवारांच्या नांवामागे श्री. या उपपदाशिवाय दुसरें कोणतेंहि (उदा. डॉ. प्रा. वगैरे) सन्मानदर्शक उपपद न लावणें यासंबंधीचा ठराव सभेपुढे आला. त्यावर साधकबाधक चर्चा झाल्यावर, डॉ. पु. गो. एकबोटे यांनी हा ठराव नियमबाह्य असल्याबद्दल प्रश्न उपस्थित केला. त्यावर हा ठराव नियमबाह्य आहे, असा अध्यक्षांनी निर्णय दिल्यावर सभा संपली.

अधिवेशनाच्या कार्यक्रमास प्रारंभ

दि. २५-१२-५३ रोजीं सायंकाळीं ठीक ४ वा. अधिवेशनाच्या प्रमुख कार्यक्रमाला सुरुवात झाली. स्वयंसेवकांनी बँडच्या मधुर निनादांत संमेलनाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांना खडी सलामी दिल्यावर, अध्यक्षांनी सभामंडपांत प्रवेश करतांच टाळ्यांच्या कडकडाटांत त्यांचें स्वागत करण्यांत आलें. नंतर शृंगारलेल्या भव्य व्यासपीठावर अग्रभागीं संमेलनाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित विराजमान झाले. त्यांचे शेजारीं व्यासपीठावर वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. मा. गो. देशमुख, डॉ. शं. दा. पेंडसे, महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष श्री. भा. वि. वरेरकर, सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे, स्वागताध्यक्ष डॉ. पु. गो. एकबोटे, स्वागतोपाध्यक्ष श्री. द. रा. गोमकाळे, स्वागत मंडळाचे मुख्य कार्यवाह प्रा. के. मा. मुनशी, श्री. प्रभाकरराव माचवे, पंधे गुरुजी प्रभृति मंडळी विराजमान झाली होती. नागपूर, अमरावती, बुलढाणा, आकोला, चांदा, सागर, भंडारा, वर्धा, यवतमाळ वगैरे जिल्ह्यांतील सुमारें दीडशे प्रतिनिधि, निरनिराळ्या दूरदूरच्या विभागांतील पाहुणे आणि हजारो स्त्रीपुरुषांनी सभामंडप फुलला होता.

स्वागताध्यक्ष डॉ. पु. गो. एकबोटे यांचें भाषण

श्री. द. रा. गोमकाळेकृत स्वागतपर मधुर गीत व कै. तात्यासाहेब कोल्हटकरकृत महाराष्ट्रगीत झाल्यावर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. पु. गो. एकबोटे यांचे नियोजित अध्यक्षांचें हार्दिक स्वागत करतांना मोठें सूचक व उद्बोधक भाषण झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले, "खामगावचें नांव घेतांच अखिल महाराष्ट्राचें अंतःकरण ज्या एका दिवंगत व्यक्तीच्या स्मृतीने भरून येतें ती व्यक्ति म्हणजे कै. श्रीपाद कृष्ण किंवा आपले सर्वांचे तात्यासाहेब कोल्हटकर होत. त्यांचें साहित्यिक ऋण महाराष्ट्र व महाराष्ट्र शारदा कधीच अमान्य करूं शकणार नाही. अशा थोर पुरुषाच्या स्मारकाची योजना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाने आखणें आवश्यक आहे. या दृष्टीने आम्ही वि. सा. संघाकडे आशेने पाहत आहोंत. नागपूर-वऱ्हाड या भागांतील राज्यकारभार मराठींतच व महाकोशलमधील कारभार हिंदींतूनच चालावा अशी कायद्यांत स्पष्ट तरतूद केल्याशिवाय मराठीवर आजच्या कायद्याने निश्चितपणे होणारा अन्याय दूर होणें शक्य नाही. संघाने आज हें नेटाने करण्यासारखें कार्य आहे व मराठी भाषेच्या विकासासाठी व समृद्धीसाठी त्याची आज फार जरूर आहे. विदर्भ साहित्य संघाच्या कार्यात फलनिष्पत्तीची निश्चिति हवी असेल तर मराठी भाषा बहुसंख्याकांची राजभाषा बनूं शकेल असा सलग मराठी भाषिकांचा प्रांत बनविणें याशिवाय अन्य उपाय नाही. तसेंच आजचें वाङ्मय वर्गविशिष्ट न राहतां तें सर्वव्यापी कसें होईल व समाजांतील खालच्या थरांतील व्यक्तींच्या पातळीपर्यंत कसें पोचेल याचा ध्यास आज साहित्यिकांना लागावयास पाहिजे. ”

संमेलनाध्यक्षांचा गुणगौरव व स्वागत

यानंतर, अध्यक्षपदासाठी प्रा. भ. श्री. पंडित यांचें नांव डॉ. शं. दा. पेंडसे यांनी सुचवितांना प्रा. पंडित यांच्या मराठी काव्यनिर्मितीबद्दल त्यांचा गौरव केला. सागरतर्फे प्रा. दा. ल. अडोणी, अमरावतीतर्फे प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, खामगावतर्फे श्री. द. रा. गोमकाळे, नागपूरतर्फे डॉ. वि. भि. कोलते व डॉ. मा. गो. देशमुख, अकोल्यातर्फे मीमांसाभूषण पु. बा. साठे, चांद्यातर्फे प्रा. के. ज. पुरोहित यांनी अध्यक्षांच्या साहित्यांतील विविध पैलूंचें विशेषत्व दर्शवून डॉ. पेंडसे यांच्या सूचनेला दुजोरा दिला. प्रा. भ. श्री. पंडित यांनी संमेलनाचें अध्यक्षस्थान ग्रहण केल्यावर स्वागत मंडळातर्फे त्यांना घोसदार सुवक हार अर्पण करण्यांत आला व मग स्थानिक व प्रांतांतील विविध संस्थांतर्फे अध्यक्षांना पुष्पमाला अर्पण करण्यांत येऊन, त्यांचें थाटाने स्वागत करण्यांत आलें.

संमेलनाला आलेले शुभ संदेश

अधिवेशनाला आलेले शुभ संदेश स्वागत मंडळाचे मुख्य कार्यवाह प्रा. के. मा. मुनशी यांनी वाचून दाखविले. शुभ संदेश पाठविणाऱ्या प्रमुख व्यक्ति येणेप्रमाणे : मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभी सीतारामय्या, नागपूर उच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश श्री. बी. पी. सिन्हा, नागपूर विद्यापीठाचे उपकुलगुरु पं. कुंजीलालजी दुबे, वि. सा. संघाचे विश्वस्त लोकनायक डॉ. बापूजी अणे व न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, लोकसभेचे अध्यक्ष श्री. ग. वा. मावळणकर, हैद्राबाद राज्य विधानसभेचे अध्यक्ष श्री. काशीनाथराव वैद्य, मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व म. प्र. चे अर्थमंत्री श्री. ब्रिजलालजी बियाणी, अन्नमंत्री श्री. दीनदयाल गुप्त, राजस्वमंत्री श्री. भगवंतराव मंडलोई, म. म. दत्तो वामन पोतदार, पुण्याचे श्री. र. पु. परांजपे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे चिटणीस श्री. वा. दा. गोखले, मुंबईचे पुनर्वसन खात्याचे मंत्री श्री. ग. दे. तपासे, मध्यप्रदेशाचे उपमंत्री सौ. प्रभावतीबाई जकातदार व श्री. गणेशराम अनंत, प्रजासमाजवादी पक्षाचे हंगामी मंत्री श्री. ना. ग. गोरे, सेनापती बापट, भारतीय लोकसभेचे सदस्य डॉ. ना. भा. खरे, यवतमाळचे डॉ. य. खु. देशपांडे, 'तरुण भारता'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, अमरावतीचे श्री. बा. ग. खापर्डे व 'उदय'चे संपादक श्री. ना. रा. बामणगावकर, नागपूरचे प्रा. पां. कृ. सावळापूरकर, पुण्याचे श्री. महादेवशास्त्री जोशी; याशिवाय श्री. ग. वा. कवीश्वर (इंदूर), श्री. न. चिं. केळकर (मुंबई), श्री. रा. प्र. कानिटकर (पुणें), प्रा, म. वि. फाटक (अमळनेर), श्री. अष्टपुत्रे (कच्छ), श्री. रा. आ. बेलसरे (मोर्शी), श्री. के. स. तायडे. (वर्धा) श्री. द. कृ. मोहनी (नागपूर), रावबहादूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाऊसाहेब खळतकर (दिग्रस बुजरुक), श्री. बी. के. बेऊरकर (हैद्राबाद), श्री. ना. ग. डबीर (गोंदिया), प्रा. भी. गो. देशपांडे (बनारस), श्री. प्र. गो. शेंदुर्णीकर (भंडारा), श्री. अनंत नारायण पारसनीस (सातारा), श्री. या. मु. मुळे (कलकत्ता), श्री. भी. दे. कारंजकर (अमरावती), प्रा. अ. ना. देशपांडे (नागपूर), श्री. माणिकराव बैतुले (नागपूर), श्री. नाना काणे (खंडवा), श्री. जवाहरलाल दर्डा (यवतमाळ) श्री. गोविंद माधव किनखेडे (भंडारा), श्री. तु. ना. काटकर (चांदा) इत्यादि.

प्रा. भ. श्री. पंडित यांचें अध्यक्षीय भाषण

त्यानंतर संमेलनाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांचें सर्वस्पर्शी असें विचारपरिप्लुत अध्यक्षीय भाषण झालें. त्यांनी आपल्या प्रभावी भाषणांत प्रांतिक भाषांचें भवितव्य, प्रांतांची भाषिक पुनर्रचना, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति, हिंदी-मराठीचे स्नेहसंबंध, भावी संघराज्य भाषा, प्रचलित साहित्यांतील उणीवा आणि ऐतिहासिक, संशोधनात्मक व काव्य तथा ललितवाङ्मय इत्यादि प्रमुख मुद्यांवर विशेष भर दिला. हें समग्र भाषण जानेवारी १९५३ च्या ' युगवाणी'च्या अंकांत प्रसिद्ध झालेंच आहे.

श्रीमती कालिंदी केसकर यांचें सुश्राव्य गायन

त्याच दिवशीं रात्रीं १० वा. मुंबईच्या श्रीमती कालिंदी केसकर यांचें सुश्राव्य गायन झालें. त्यांच्या ढंगदार गायनशैलीने आणि कर्णमधुर स्वरालापांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलें होतें.

श्री. भा. वि. वरेरकर यांची नाट्यसृष्टि

शनिवार दि. २६-१२-५३ हा संमेलनाचा दुसरा दिवस. या दिवशीं सकाळीं ८-३० वा. महाराष्ट्राचे ख्यातमान साहित्यिक श्री. भा. वि. उर्फ मामासाहेब वरेरकर यांचें 'नाट्यसृष्टि' या विषयावर मोठें उद्बोधक व मार्गदर्शनपर भाषण झालें. ते आपल्या विचारप्रवर्तक भाषणांत म्हणाले, "साहित्य आणि कला यांच्या क्षेत्रांत महाराष्ट्रांत नाट्यसृष्टीला अग्रस्थान आहे. राजकारण असो, समाजकारण असो, धर्मकारण असो की भाषाकारण असो, या सर्व क्षेत्रांत सर्वप्रकारें प्रभाव पाडला असेल, तर तो मराठी नाट्यसृष्टीने. नाट्यसृष्टींत सर्व कलांचा समावेश होतो. वाङ्मय हा त्यांतला एक विभाग आहे. नाट्यसृष्टीशीं साहित्यसृष्टीचा प्रत्यक्ष कोणत्याच प्रकारचा संबंध नाही. नाटककार-म्हणजे नाट्यलेखक नव्हे-नाटकाची निर्मिति करणारा नाटककार हा प्रतिसृष्टि निर्माण करणारा एक विश्वामित्र आहे. नाटक हें करमणुकीचें साधन आहे, असा एक गैरसमज करून देण्यांत येत असतो, तो सर्वस्वी चुकीचा आहे. शिक्षण ही जशी कला आहे, तशीच नाट्य ही एक कलाच आहे; किंबहुना नाट्य असल्याशिवाय शिक्षणकलाहि प्रभावी होऊं शकणार नाही. त्या शिक्षणकलेचा आत्मा नाट्यच असतो, हें ज्याला कळेल, त्यालाच नाट्यसृष्टि हें शिक्षणाचें क्षेत्र कसें आहे, याची अचूक कल्पना येईल." त्यानंतर त्यांनी मराठी नाटकांची आणि रंगभूमीची परंपरा कशी सुरू झाली हें सांगून, प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या रंगभूमीच्या कार्याचा तुलनात्मक आढावा घेतला. शेवटीं ते म्हणाले, "मराठी साहित्य, मराठी संगीत आणि मराठी कला या तिहींचेंहि महत्त्व दिल्लीला पटवून देण्यासाठी मराठी नाटककारांनी लिहिलेलीं, मराठी लेखकांनी अनुवादित केलेलीं, मराठी दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेलीं आणि मराठी नटनटींनी अभिनीत केलेलीं हिंदी नाटकें दिल्लीच्या रंगभूमीवर प्रयोगित झालीं, तर साहित्याच्या आणि कलेच्या क्षेत्रांत महाराष्ट्राचा दर्जा काय आहे याची यथार्थ कल्पना दिल्लीश्वरांना येऊं लागेल. आजच्या महाराष्ट्राला, साहित्यिक आणि कलाप्रवण महाराष्ट्राला आजच्या काळाचा हाच संदेश आहे."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषयनियामक समितीची बैठक

विषयनियामक समितीची बैठक सकाळीं १० वा. संमेलनाच्या सभास्थानीं प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली भरून, दिवंगतांबद्दल दुखवटा, साहित्य ॲकॅडेमीच्या निर्मितीबद्दल केंद्रीय सरकारचें अभिनंदन, प्रांतांची पुनर्घटना करतांना भाषेला प्राधान्य, सुलभ प्रशासन कोष, प्राथमिक-पाठ्यपुस्तकें आणि मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमाच्या दुरुस्तीच्या ठरावाचा पुनरुच्चार करणारे सहा ठराव या बैठकींत साधकबाधक चर्चेनंतर संमत झाले. ते ठराव खुल्या अधिवेशनांत मंजूर झाले ते अन्यत्र दिलेच आहेत.

कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या वाङ्मयावर परिसंवाद

कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या विविध वाङ्मयीन बाजूंवर प्रकाश टाकणारा अत्यंत बोधप्रद असा परिसंवाद दुपारीं दोन वाजतां प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली झाला. प्रा. ह. ना. नेने यांनी कोल्हटकरांच्या काव्यासंबंधी विवेचन केलें; तर डॉ. मा. गो. देशमुख यांनी तात्यासाहेबांच्या टीकाविषयक लेखांचे समालोचन केलें. प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांनी कोल्हाटकरांचा विनोद हाताळला तर प्रा. प्रभाकरराव ऊर्ध्वरेषे यांनी त्यांच्या कादंबऱ्यांवर प्रकाश टाकला. श्री. द. रा. गोमकाळे यांनी कोल्हटकरांच्या नाटकांसंबंधी चिकित्सक मीमांसा केली.

खुलें अधिवेशन

नंतर सायंकाळीं ४ वा. प्रा. पंडित यांचे अध्यक्षतेखाली खुल्या अधिवेशनाला सुरुवात होऊन अन्यत्र देण्यांत आलेले पहिले चार ठराव या खुल्या अधिवेशनांत मंजूर झाले.

'हास्य आणि अश्रू' यावर आचार्य अत्रे यांचें भाषण

सायंकाळीं ६-३० वा. प्रा. पंडित यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्राचे सुविख्यात साहित्यिक व प्रभावी वक्ते आचार्य प्र. के. अत्रे यांचें 'हास्य आणि अश्रू' या विषयावर अत्यंत मार्मिक व रसाळ भाषण झालें. ते म्हणाले, "जेवणांत जर रसपूर्ण अन्न नसेल तर रुचि नाही. लग्नांत जसें परस्परांवर अनुरक्त झालेल्या वधूवराला महत्त्व तसेंच साहित्यांत रसाला महत्त्व आहे. तंत्राला नाही. रसाने साहित्य थबथबलेलें असावें. वाङ्मयांतील रसाला विशिष्ट सामर्थ्य आहे. मनुष्याच्या भावनांना शुद्ध ठेवण्याचें सामर्थ्य एकट्या रसांतच आहे. त्याने मनावर, समाजावर, जीवनावर प्रभाव होतो. त्याने क्रांति होते. वाङ्मयांत मन द्रवविण्याचें सामर्थ्य असेल तरच तें अभिजात वाङ्मय होय. या वाङ्मयांत करुण आणि हास्य हे दोन महत्त्वाचे रस आहेत. हे रस जर वाङ्मयांत नसतील तर क्रांति होणार नाही." हास्य व करुण रस कसा निर्माण होतो याबद्दल विविध उदाहरणें देऊन ते म्हणाले, " जगाच्या दुःखाशीं समरस होऊन साने गुरुजींनी वाङ्मय निर्माण केलें म्हणूनच तें इतकें करुणरसपूर्ण झालें. म्हणूनच तें वाङ्मय प्रभावी ठरलें. अश्रु हा जितका उपकारक आहे तितकाच विनोद उपकारक आहे. स्वर्गांत काव्य आहे आणि पृथ्वीवर विनोद आहे, असें म्हणतात. वास्तविक पृथ्वीवरील नाना दुःखांत विनोद असावा यांत वैशिष्ट्य आहे. त्या विनोदामुळेच दुःखी माणसाला आपलें जीवन जगणें सहन होतें. अप्रिय गोष्टींतूनहि कित्येकवेळां विनोद निर्माण होतो, तसेंच कांही वेळां प्रसंगनिष्ठतेंतूनहि विनोद निर्माण होतो. विनोदानें मन तसेंच वातावरण शुद्ध होतें. जीवनांतील बिकट समस्येंतूनहि कित्येक वेळां विनोदानें वाट निघते. जगांतलें अज्ञान—मूर्खपणा इत्यादि सर्व वाईट गोष्टी नाहीशा व्हाव्या हाच विनोदाचा प्रधान हेतु आहे."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'हाच मुलाचा बाप' या नाटकाचा अपूर्व प्रयोग

रात्रीं ९-३० वा. श्री. मामा वरेरकरकृत 'हाच मुलाचा बाप' या नाटकाचा प्रयोग खामगाव येथील नाट्यप्रेमी मंडळींनी अत्यंत बहारदारपणे वठविला. या नाटकाची अपूर्वता म्हणजे श्री. द. रा. गोमकाळे यांनी सादर केलेला, डॉ. पु. म. पारसनीस यांनी दिग्दर्शित केलेला, स्त्री-पुरुष पात्रांनी आपल्या अभिनयकुशलतेने आकर्षक केलेला आणि विशेषतः नाटककार श्री. मामासाहेब वरेरकर यांनी स्वतः उपस्थित राहून आशीर्वाद दिलेला असा हा प्रयोग होय.

कवि ना. घ. देशपांडे यांचें भाषण

रविवार दि. २७-१२-५३ हा संमेलनाचा तिसरा दिवस. या दिवशीं सकाळीं ८-३० वाजतां कवि ना. घ. देशपांडे यांनी 'मराठी काव्य' या विषयावर भाषण करतांना जुन्या व नव्या कवींच्या काव्याचें मार्मिक समालोचन केलें. ज्ञानेश्वरापासून आजपर्यंत कोणत्या परिस्थितींत कवींनी कविता लिहिल्या, त्यांची पार्श्वभूमि काय होती व त्यांची पूर्व परंपरा काय होती याची सांगोपांग चर्चा करून ते शेवटीं म्हणाले, "स्वयंपूर्ण प्रतिभेने व उदात्त विजीगिषेने प्रेरित होऊन आधुनिक मराठी कवितेचे कर्णधार केशवसुत यांनी मराठीच्या नवकवितेची व नव्या जीवनाची तुतारी फुंकली. त्याबरोबर नव्या अंतरंगांत नव्या स्फूर्तीचें वारें शिरलें व एकावर एक सरस अशा कवींची परंपरा महाराष्ट्रांत निर्माण झाली. त्या सर्व कवींनी मराठी कवितेला जागतिक कवितेच्या तोलाला फार अल्पकाळांत आणलें. या सर्व कवींच्या प्रेरणेने मराठी कविता आज जगांतील कोणत्याहि कवितेच्या बरोबरीने उभी राहण्यास समर्थ झाली व आता तिचा खरा कलाविलास सुरू झाला आहे असें दिसत आहे. किशोरावस्था संपून यौवनाच्या ऐनींत मराठीने नुकतेंच पदार्पण केलें आहे असें आता निःशंसय म्हणतां येईल."

पंधेगुरुजींच्या राष्ट्रीय टिळक विद्यालयाला साहित्यिकांची भेट

दुपारीं २ वा. संमेलनाला उपस्थित असलेल्या साहित्यिक प्रतिनिधींनी पंधेगुरुजींच्या राष्ट्रीय टिळक विद्यालयाला भेट दिली. तेथील कार्य, शिस्त आणि व्यवस्था पाहून सर्वांनी समाधान व्यक्त केलें. त्याप्रसंगीं संमेलनाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित व आचार्य प्र. के. अत्रे यांनी पंधेगुरुजींच्या मौलिक कार्याबद्दल गौरवपूर्ण उद्‌गार काढून, आपल्या भाषणांत विद्यालयांतील विद्यार्थ्यांचें कौतुक केलें.

डॉ. वि. भि. कोलते यांचें भाषण

दुपारीं ३-३० वा. ख्यातनाम साहित्यिक व संशोधक डॉ. वि. भि. कोलते यांचें 'मराठी गद्य' या विषयावर विद्वत्तापूर्ण भाषण झालें. महानुभाव वाङ्मयांतील अगदी प्राचीन गद्यापासून तों अद्ययावत् मराठी गद्याचा विकास कसकसा होत गेला याची त्यांनी उत्कृष्ट व सांगोपांग माहिती दिली. या त्यांच्या भाषणामुळे संमेलनाच्या भरगच्च कार्यक्रमांत महत्त्वाची भर पडली.

खुलें अधिवेशन, समारोप व आभार प्रदर्शन

सायंकाळीं ५ वा. खुल्या अधिवेशनाला सुरुवात होऊन आदल्या दिवशीचे उरलले दोन ठराव मंजूर झाले. ते पहिल्या चार ठरावांबरोबर अन्यत्र दिले आहेत.

त्यानंतर संमेलनाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांनी समारोपाचें सुंदर भाषण करून स्वागत मंडळ व खामगावकर कार्यकर्ते यांचे आभार मानले. नंतर स्वागतमंडळातर्फे डॉ. पु. गो. एकबोटे यांनी प्रतिनिधींचे आभार मानणारें भाषण केल्यावर, वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. ना. रा. शेंडे यांनी उचित शब्दांत खामगावकरांनी संमेलनाची उत्तम व्यवस्था ठेवून, वि. सा. संघाचें १६ वें अधिवेशन १६ आणे यशस्वी करून दाखविलें, याबद्दल मनःपूर्वक आभार मानले. त्याचप्रमाणे प्रतिनिधींतर्फे श्री. रा. पु. सगदेव, प्रा. श्री. वि. गंधे, श्री. प्र. ना. खोडे व प्रा. पेशकर यांचीं आभाराचीं भाषणें झालीं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंतर रात्रीं १-३० वा. श्री. डावरे यांची 'जेलर' ही उत्कृष्ट श्रुतिका व स्थानिक कलावंतांचे विविध करमणुकीचे नाट्यप्रवेश झाल्यावर अधिवेशनाचा हा अपूर्व सोहळा समाप्त झाला.

संमेलनाच्या पूर्ण श्रेयाचे वाटेकरी

स्वागताध्यक्ष डॉ. पु. गो. एकबोटे, स्वागतोपाध्यक्ष श्री. द. रा. गोमकाळे, स्वागतमंडळाचे प्रमुख कार्यवाह प्रा. के. मा. मुनशी, अपर कार्यवाह डॉ पु. म. पारसनीस यांनी अत्यंत परिश्रम घेऊन संमेलन पूर्णतः यशस्वी केलें; तसेंच श्री. रा. रा. ओझकर, श्री. मु. श्री. पंचे गुरुजी, श्री. सो. रा. माटे, श्री. मोहनलालजी पुरवार, प्रा. प्रभाकरराव ऊर्ध्वरेषे, श्री. गोविंदसेठ भाटिया, श्री. थत्ते, श्री. बेनोडेकर श्री. अ. दे. महाशूर, प्रा. तारे, श्री. नाईक, श्री. डावरे, श्री. अडावतकर, श्री. ही. द. कठाणे, श्री. फैजपूरकर, श्री. काणे, श्री. गोविंदराव भिडे, श्री. दि. गो. विद्वांस, श्री. गो. सी. ठोंबरे, श्री. जोशी, श्री. हिंमतराव देशमुख, श्री. तायडे, सौ. कोठारे, सौ. इंदिराबाई खांडेकर प्रभृति मंडळींनी घेतलेले कष्ट विशेष उल्लेखनीय होते.

* *

वि. सा. संघाला भेटी आणि भाषणें

—प्रख्यात साहित्यिक डॉ. मुल्कराज आनंद यांनी दि. २-१२-५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. त्यावेळीं त्यांचा सत्कार करण्यांत आला.

—मुंबईचे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि टीकाकार प्रा. न. र. फाटक यांनी दि. ४-१२-५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या प्रसंगीं 'मराठी इतिहास' या विषयावर त्यांचें उद्बोधक भाषण झालें.

—हिंदीचे ख्यातनाम साहित्यिक व तत्त्वज्ञ श्री. जैनेन्द्रकुमार यांनी दि. ५-१२-५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. सांस्कृतिक समितितर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आल्यावर, 'साहित्य समीक्षा' या विषयावर त्यांचें विचारपरिप्लुत भाषण झालें.

—मुंबईचे एक प्रसिद्ध कलाकार श्री. दीनानाथ टाकळकर यांचें दि. १३-१२-५३ रोजीं डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखाली अतिशय सुंदर असे 'साभिनय नाट्यप्रयोग' झाले.

—मुंबईचे सुप्रसिद्ध लघुकथालेखक प्रा. गंगाधर गाडगीळ यांनी दि. २०-१२-५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यांत आल्यावर 'नव काव्य' या विषयावर अतिशय मार्मिक असें त्यांचें भाषण झालें.

—क्रांतिकारक श्री. रामलाल वाजपेयी यांनी दि. २१-१२-५३ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. त्यावेळीं संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. श्रीमंत दामुपंत देशमुख यांनी त्यांचा उचित शब्दांत परिचय करून दिल्यावर, श्री. पु. य. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली 'माझें अमेरिकेंतील जीवन' या विषयावर त्यांचें मोठें सूचक व हृदयस्पर्शी भाषण झालें.

—मुंबईचे शेतकरी-कामकरी पक्षाचे चिटणीस श्री. रघुनाथराव खाडिलकर यांनी वि. सा. संघाला भेट दिली. संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यावेळीं त्यांनी वि. सा. संघाच्या कार्यकर्त्यांशी मराठी साहित्याच्या प्रगतीविषयी चर्चा केली.

—जळगावचे सुप्रसिद्ध निबंधकार व टीकाकार प्रा. म. ना. अदवंत यांनी दि. २४-१-५४ रोजीं वि. सा. संघाला भेट दिली. सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे त्यांचा सत्कार करण्यांत आला.

* *

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांचा गौरव

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे दि. २०-१२-५३ रोजीं संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला. त्याप्रसंगीं प्रा. ह. ना. नेने, प्रा. श्री. वि. गंधे, डॉ. वि भि. कोलते, प्रा. कु. कुसुममाला कोलारकर, श्री. रा. पु. सगदेव प्रभृतींचीं प्रा. पंडितांच्या साहित्यांतील विविध कामगिरीबद्दल व त्यांच्या स्वभावविशेषाबद्दल गुणगौरवपर भाषणें झालीं.

* *

गडकरी-स्मृतिदिन

दि. २३ जानेवारी १९५४ रोजीं सायंकाळीं ५-३० वा. वि. सा. संघाच्या गडकरी-स्मारक समितितर्फे अमरावतीचे कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली 'गडकरी-स्मृतिदिन' थाटाने साजरा करण्यांत आला. कै. राम गणेश गडकरी यांच्या भव्य प्रतिमेला विविध संस्थांतर्फे पुष्पमाला अर्पण करण्यांत आल्यावर, संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांनी कविभूषण खापर्डे यांचा मार्मिक शब्दांत परिचय करून दिला. ग. स्मा. समितीचे कार्यवाह श्री. पां. वा. गडकरी यांनी झालेल्या कामगिरीचा सुंदर अहवाल वाचून दाखविल्यावर, अध्यक्ष कविभूषण खापर्डे यांचें 'गोविंदाग्रज' या विषयावर व्यासंगपूर्ण भाषण झालें. विशेषतः गडकऱ्यांच्या गूढगुंजनात्मक कवितांचें त्यांनी केलेलें विश्लेषण अत्यंत मार्मिक होतें.

त्याच दिवशीं रात्रीं १-३० वा. संयुक्त नटनाट्यदर्शन पुणें, या नाटक मंडळीने, गडकरी स्मारक समितीच्या मदतीसाठी 'पुण्यप्रभाव' या नाटकाचा प्रयोग उत्कृष्ट करून दाखविला.

दुसरे दिवशीं दि. २४।१।५४ रोजीं रात्रीं ८-३० वा. गडकरी यांच्या निरनिराळया नाटकांतील कांही नाट्यप्रवेश शालेय विद्यार्थी-विद्यार्थीनींकडून करण्यांत आले. तसेंच गडकऱ्यांच्या निरनिराळया कविता गायनाचा कार्यक्रम झाला. हे दोन्ही कार्यक्रम मोठे हृदयंगम झाले.

गडकरी स्मृतिदिनानिमित्त झालेल्या '**नाट्यस्पर्धेत**' पहिलें पांच रुपयांचें पारितोषिक, नागपूर येथील दादीभाई कन्या शाळेंतील कु. प्रभा लेले इला मिळालें; दुसरें तीन रुपयांचें पारितोषिक त्याच शाळेंतील कु. रेखा खरे इने पटकावलें; व तिसरें दोन रुपयांचें पारितोषिक, धुळे महिला विद्यालयांतील कु. लीला जोशी इला देण्यांत आलें. या सर्व भूमिका गडकऱ्यांच्या नाटकांतील होत्या. याशिवाय इतरांना उत्तेजनार्थ पदकें देण्यांत आलीं.

'**निबंधस्पर्धे**' बद्दल देण्यांत आलेल्या पारितोषिकांत, पहिलें पांच रुपयांचें पारितोषिक, अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयांतील विद्यार्थिनी कु. कुमुदिनी शंकरराव देशपांडे इला मिळालें; दुसरें तीन रुपयांचें पारितोषिक, अमरावतीच्या शिवाजी महाविद्यालयांतील श्री. हे. ग. पाचपोर यांस देण्यांत आलें; व तिसरें दोन रुपयांचें पारितोषिक अमरावती येथील विदर्भ महाविद्यालयांतील श्री. व. वा. देशमुख यांस दिलें.

* *

विदर्भ साहित्य संघ—गोंदिया

विदर्भ साहित्य संघ गोंदिया शाखेचें ता० १६।१७ जानेवारीला भरणारें वार्षिक संमेलन अकस्मात् उद्भवलेल्या कांही अपरिहार्य कारणांमुळे ह्या तारखांना होणार नसून पुढे तें फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत भरणार आहे. तारखा निश्चित झाल्यानंतर जाहीर करण्यांत येतील. संमेलनाला येणाऱ्या पाहुण्यांनी या बदलाबाबत क्षमा करावी, ही विनंति.

ना. ग. डबीर
चिटणीस, वि. सा. संघ, गोंदिया शाखा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुखसाधनांचें समायोजन

(पान ५ वरून)

हें समायोजन दोन प्रकारचें व्हावें लागेल. एक सामाजिक आणि दुसरें वैयक्तिक. पहिल्याविषयी येथे विचार केलेला नाही हें मागे सांगितलेंच आहे. दुसऱ्या विषयीच येथे कांही विचार प्रदर्शित केले आहेत. बोलून चालून हें प्रत्येक व्यक्तीपुरतें समायोजन असल्यामुळें त्याचें स्वरूप व्यक्तीगणीक वेगवेगळें असणार. प्रश्न पुढे मांडून त्याच्या सोडवणुकीसाठी सूचक विवेचन करण्यापलीकडे येथे कांही करणें अशक्य. सुखसाधनें हीं सुखाचींच साधनें; दुःखाचीं साधनें तर खास नव्हेत. आपली जन्मजात प्रवृत्ति आणि आपल्याला प्राप्त झालेली परिस्थिति यांस अनुसरून सुखसाधनांचें समायोजन करावें. इंद्रियांची संवेदनक्षमता आणि मनाची आस्वादक्षमता, भावनांचा सकसपणा आणि वृत्तींचा सोज्वळपणा कायम राहील अशा बेताने आणि अशा पद्धतीनें सुखसाधनांचा उपभोग घेणें म्हणजेच समायोजन किंवा संयम किंवा योग. याच्या आचरणानें खऱ्या समाधानाप्रत आपण जाऊं. ही जाणीव ठेवली म्हणजे 'योगस्थः कुरु कर्माणि' या गीतावचनाचा देखील कांही एक अभिनव आणि हृद्य असा अर्थ मनांत उतरूं लागतो.

द्वारका

(पान ८ वरून)

रुजलेला, ती चारवर्षांची असतांनाचा एक प्रसंग तिच्या थकलेल्या डोळ्यासमोर तरळून गेला—

—रडारड चालू असलेल्या घरासमोर कांही लोक तिच्या मृत आजीला करकचून लाल वस्त्रांत बांधत होते—

—तिला कोड्याचं उत्तर सापडलं. सैराट वारा कमी झाला. कोडें सुटणार. भिंती फुटणार. व्यथा संपणार. न्याय मिळणार ! ! ती सावकाश उठली. कुणाकडेच तिनं बघितलं नाही. भिंतीचा आधार घेत ती सावकाश मागल्या दारीं आली. झोक जात होता म्हणून तुळशीच्या वृंदावनावर हात ठेवला. स्वतःला सावरलं. हळूहळू, न घडपडतां, ती आडापाशीं आली. विलक्षण समाधानानं तिनं आडाच्या कठड्याला स्पर्श केला. अतिशय प्रयत्न करून ती कठड्यावर चढली. एकदा वरती बघितलं–एकदा घराकडे बघितलं. दूरवर बघितलं. नि मग मर्यादांनी जखडलेल्या ह्या भौतिक जगाकडे पाठ फिरवून तिने मुक्तीच्या अमाप आनंदानें आपला देह आडांत झोकून दिला !

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन, नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी मराठी-भाषा-प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमत : सव्वा रुपया

एकमेव विक्रेते : कर्मवीर बुकडेपो, महाल, नागपूर २

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ अधिवेशन १६ वें
खामगाव येथील संमेलनांत मंजूर झालेले ठराव

दिवंगतांबद्दल दुखवटा

(१) विदर्भ साहित्य संघाचे एक आजीव सभासद श्रीमंत नारायण व्यंकटेश उर्फ नानासाहेब देशमुख, एलिचपूर, तसेंच शिंदखेडचे राजे जाधवराव यांच्या गेल्या महिन्यांत झालेल्या अकालीं निधनाबद्दल या सभेस अत्यंत दुःख होत आहे. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या दुःखांत हें संमेलन सहभागी आहे. (अध्यक्षांकडून)

साहित्य ॲकॅडेमीच्या निर्मितीबद्दल केन्द्रीय सरकारचें अभिनंदन

(२) भारतीय साहित्याच्या विकासासाठी केंद्र सरकारने साहित्यिक ॲकॅडेमी निर्माण केल्या-बद्दल वि. सा. संघ केंद्र सरकारचें अभिनंदन करीत आहे. भारतांतील भिन्नभाषिक साहित्यिक आणि साहित्यसंस्था यांच्या न्याय्य हितसंबंधांचें ही संस्था रक्षण करील अशी आम्ही आशा करतों.

(अध्यक्षांकडून)

प्रांतांची पुनर्घटना करतांना भाषेला प्राधान्य

(३) प्रांतांच्या पुनर्घटनेचा विचार करण्यासाठी भारत सरकारने उच्च अधिकार समिति नियुक्त केली, याबद्दल या संमेलनास आनंद वाटतो. हिंदुस्थानांतील प्रमुख प्रांतिक भाषांचा विकास व्हावा आणि राज्यकारभार, शिक्षण, न्यायदान इत्यादि गोष्टी बहुजनसमाजाला सुलभ व्हाव्यात म्हणून प्रांतरचना करतांना भाषेला प्राधान्य द्यावें, अशी या संमेलनाची मागणी आहे.

सूचक—पुरुषोत्तम दिवाकर ढवळे
अनुमोदक— र. वि. करंदीकर

सुलभ प्रशासन शब्दकोष

(४) प्रादेशिक भाषांतून राज्यकारभार चालविण्याच्या तत्त्वानुसार, मराठी भाषेंतून राज्यकारभार करण्यास सर्व मराठी प्रदेशाचा प्रातिनिधिक असा प्रशासन शब्दकोष निर्माण होणें अवश्य आहे. विशेषतः मध्यप्रदेशांतील मराठी भागांत मराठींतून राज्यकारभार सुरू झाल्यापासून अशा प्रातिनिधिक कोषाचें कार्य विदर्भ साहित्य संघाने आपले अंगावर घेणें निकडीचें झालें आहे. म्हणून हें संमेलन विदर्भ साहित्य संघास अशी सूचना करीत आहे, की, विदर्भ साहित्य संघाने मराठींतून राज्यकारभार करणें सुलभ होईल असा प्रशासन कोष निर्माण करण्याचें काम अंगावर घ्यावें. हा कोष संपूर्ण मराठी प्रदेशाचा अधिकृत कोष व्हावा म्हणून या कामांत मराठी प्रदेशांतील सर्व साहित्य संस्थांचें सहकार्य घ्यावें व असा कोष जनतेला व सरकारला द्यावा.

ह्या कार्याचा प्रारंभ करण्याच्या दृष्टीने मध्यप्रदेश सरकारने प्रसिद्ध केलेल्या प्रशासन शब्द-कोषांतील शब्दांची मराठी वापराच्या दृष्टीने परीक्षा करून त्यांत योग्य त्या दुरुस्त्या ठरविण्याचें काम अंगावर घ्यावें.

सूचक-ग. त्र्यं. देशपांडे
अनुमोदक-डॉ. पु. गो. एकबोटे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राथमिक पाठ्य-पुस्तकें

(५) मध्यप्रदेश सरकारच्या शिक्षण खात्याने कित्येक वर्षांपूर्वी प्राथमिक शाळांसाठी मंजूर केलेलीं व अजून चालू असलेलीं मराठी विषयांचीं पुस्तकें अत्यंत सदोष, नीरस व टाकाऊ अशीं आहेत. त्याऐवजीं स्वातंत्र्योत्तर काळाला अनुरूप अशीं सुलभ, मनोरंजक व शिक्षणाचा दर्जा वाढविणारीं योग्य पुस्तकें सुरू करावयास हवीं. अशीं पुस्तकें तयार करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारच्या शिक्षण खात्याने तावडतोब कारवाई करावी, अशी या संमेलनाची सरकारला सूचना आहे.

सूचक-ग. त्र्यं. देशपांडे
अनुमोदक-श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी

मध्यप्रदेश राजभाषा अधिनियमाच्या दुरुस्तीच्या ठरावाचा पुनरुच्चार—

(६) "मध्यप्रदेश राजभाषा अधिनियम १९५०" हा मंजूर होण्यापूर्वीपासून विदर्भ साहित्य संघाने व त्याच्या शाखोपशाखांनी त्यांत दुरुस्ती व्हावी अशी वेळोवेळीं मागणी केली होती. या दुरुस्तीचें विधेयक गेल्या वर्षी विधान सभेंत कांही सदस्यांनी आणलें होतें. त्या विधेयकास गेल्या वर्षीच्या मोझरी संमेलनांत विदर्भ साहित्य संघाने पाठिंबा देऊन आपल्या मागण्यांचा पुनरुच्चार केला होता. शिवाय एका वाङ्मयीन व भाषिक संस्थेच्या ज्या मर्यादा असतात, त्या सांभाळून विदर्भ साहित्य संघाने शिष्ट मंडळातर्फे जें जें करणें शक्य होतें तें सर्व केलें आहे; असें असूनहि अजूनसुद्धा राज्यभाषा अधिनियमांत अपेक्षिलेली दुरुस्ती सरकारतर्फे झालेली नाही. उलट गेल्या सप्टेंबरपासून राजभाषेचा कायदा जशाचा तसाच अमलांत आला आहे. विदर्भ साहित्य संमेलनास ही स्थिति समाधानकारक वाटत नाही. म्हणून विदर्भ साहित्यसंघाचें हें खामगांव संमेलन या कायद्याबाबत आपल्या मागील मागण्यांचा पुनरुच्चार करून मध्यप्रदेश सरकारला निर्वाणीची अशी विनंती करीत आहे की—

(१) मध्यप्रदेशांत प्राधान्येंकरून मराठी भाषी विभागाची राजभाषा मराठी, प्राधान्येंकरून हिंदीभाषी विभागाची राजभाषा हिंदी व ज्या विभागांत असें ठरवितां येत नाही, तेथे हिंदी व मराठी अशा दोन्हीहि भाषा राजभाषा म्हणून जाहीर कराव्यात व संबंधित भागाशी सचिवालयाचा होणारा व्यवहार त्या त्या भाषेंतून व्हावा.

(२) तसेंच राजभाषा अधिनियमाचें ४ थें कलम रद्द करण्यांत यावें.

(३) व अशा तऱ्हेची दुरुस्ती करणारें विधेयक येत्या विधान सभेच्या अधिवेशनांत सरकारतर्फे मांडण्यांत यावें.

सूचक—ग. त्र्यं. देशपांडे
अनुमोदक--डॉ. पु. गो. एकबोटे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक : पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वार्षिक वर्गणी पांच रुपये : : सभासदांना विनामूल्य : : सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीनें उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें काय जोमानें सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपानें अधिक धडाडीनें करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनानें मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटानें चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ